# ॥ चैतन्य लहरी ॥



सन १९९४-९५, ऑगस्ट, अंक क्र. १

# श्री श्रीकृष्ण पूजा

## हथनीकुंड ११ डिसेंबर १९९३

आज आपण श्रीकृष्णांची पूजा करणार आहोत. श्रीकृष्णांच्या जीवनामधे यमुना नदीला खूप स्थान आहे. यमुना नदी खुप खोल आहे आणि तिच्या पाण्याचा रंग निळा आहे. श्रीकृष्णाचा रंगही निळाच आहे. त्यामानाने गंगा नदी उथळ आहे पण तिच्या पाण्याला जास्त वेग आहे. पुढच्या वर्षी जमलं तर आपण अलाहाबादला जाऊ आणि या दोन महानद्यांचा संगम बघू. हरियाना राज्य हे खुप ऐतिहासिक पार्श्वभूमि असलेलं राज्य आहे. त्याचे संदर्भ पुराणांत सापडतात, इथेच कुरुक्षेत्रावर कौरव- पाडवांचं महाभारत घडलं. फार पूर्वीपासून या भूमीवर तपस्वी संतांनी ध्यान केलं. मार्कंडेयांनी इथेंच ध्यानधारणा केल्याचं तुम्हाला माहीतच आहे, त्याचं नावंही तुम्ही बरेच वेळां ऐकलं आहे. प्रथम ते महाराष्ट्रांत तुम्ही पाहिलेल्या सप्तश्रृंगी इथें होते व नंतर ते ध्यानासाठी इथें आले व त्यांची ग्रंथनिर्मिती इथंच झाली. या प्रदेशांत तुम्हाला ठिकठिकाणीं पीर व साक्षात्कारी आत्मे आढळतील, त्यांचा आदरही ठेवला जातो. श्रीकृष्ण इथें राहिले म्हणून ही पुण्यभूमि झाली. त्याकाळीं गाड्या व इतर वाहतुकीची साधनं नव्हती म्हणून ही भूमि त्यांच्या चैतन्यानं वहरुन गेली. यमुना नदीकाठीं ते खूप खेळायचे - वागडायचे, तरी पण बाल्यावस्थेंत ते इथं नव्हते. पक्ष राज्यपद मिळाल्यावर ते इथें बरेच वेळां आले. श्रीकृष्णाचं व्यक्तिमत्व आपण एका वेगळ्याच दृष्टिकोनांतून समजून घेऊ शकतो. प्रथम श्रीरामांचा अवतार झाला. श्रीविष्णूनें हा अवतार घेतला असला तरी त्यामधें ते आपले देवत्व विसरुन आले किंवा त्यामागें तशीच योजना होती. ते साध्या माणसासारखंच राहिले आणि एक परोपकारी राजा सॉक्रेटीसनें म्हटल्यासारखे बनले. त्यांना आपल्या पत्नीचा पण त्याग करावा लागला, अर्थात त्यामागें एक सूत्र होतं. उत्तर भारतामधें ते जिथें जिथें हिंडले तेथील वातावरण चैतन्यानं भरुन आलं. पण नंतर महाराष्ट्रांत आल्यावर मैलोन्‌मैल ते अनवाणी हिंडले, आणि ही सर्व भूमि त्यांनी चैतन्यानें भारून ठेवली. ही भूमि मोठमोठ्या संताच्या आणि अवतारी पुरुषांच्या चैतन्यानें भरलेली आहे. श्रीकृष्ण एका अंगाने बालकासारखा होता व त्याला सगळीकडे आनंदाच वातावरण निर्माण करायचं होतं कारण श्रीरामानंतर धर्माचं स्वरुप पुर्णपणें बदलून एक कडक शिस्तबद्ध वातावरण बनलं होतं. नंतरचा अवतार श्रीकृष्ण म्हणून झाला आणि त्याला दाखवून द्यायचं होतं की परमात्म्याचं स्वरुप गंभीर नसून ही एक लीला असते ज्यांत प्रत्येकानें आपला खेळ खेळायचा असतो. लोक श्रीकृष्णाला खरं म्हणजे नीट समजून घेत नाहीत. श्रीरामांच्या अवतार - कार्यातुन पुढं विकसित झालेलं श्रीकृष्णाचं अवतारकार्य सामान्य माणसाच्या ग्रहणशक्तीच्या पलीकडचं आहें आणि माझ्या मते ते जास्त उच्च आहे, कारण त्यांना दाखवून द्यायचं होतं की जग ही एक माया आहे, भास आहे आणि त्याच्या पलीकडे सारा आनंदच आहे. त्याची पद्धतही फार मजेदार होती. त्या काळीं असे भव्य मंडप, शिष्यसमुदाय वगैरे कांही नव्हतं. त्यामुळे त्यानें स्वतःचीच नवी पद्धत शोधून काढली. त्याच्या लहानपणीं दूध देणाऱ्या बऱ्याच गोपी यमुना नदीवर स्नानाला येत असत. श्रीकृष्ण त्यांच्या डोक्यावरचे घडे दगड मारुन फोडायचा आणि त्यातलं पाणी त्यांच्या पाठीवरुन खाली पडत असे. यमुनेचं हे पाणी "राधेने" चैतन्ययुक्त केलं होतं. "रा" म्हणजे शक्ति आणि "धा" म्हणजे धारण करणारी. त्या गोपींना "कुंडलिनी" बद्दल कसं सांगायचं हे त्याला कळेना, म्हणून तो त्यांच्या डोक्यावरच्या घड्यावर खडे मारायचा आणि ते पाणी त्यांच्या पाठीवरुन खाली पडतांना त्यांना कुंडलिनीचा प्रसाद मिळायचा त्याची पद्धत साधी, खेळकर व मजेदार असायची पण तो असं का करायचा हे लोकांना समजत नसे. तो जेव्हा अगदी लहान वयाचा होता तेव्हां नदीच्या पाण्यांत स्नान करणाऱ्या गोपींची कुंडलिनी उचलायचा प्रयत्न करीत असे, तो त्यांचे कपडे चोरुन लपवीत असे व त्याना चैतन्य देत असे.

पुष्कळ लोकांना तो खरा कोण होता हे माहित नव्हतं.एक तर तो अगदीं लहान होता., निष्पाप होता , आणि गंमती-जमती करुन त्याला दाखवायचं होतं की जीवन हे आनंदमय आहे.मग तो त्यांचे कपडे परत करीत असे. पुढें मोठा झाल्यावर तो द्वारकेचा राजा झाला.आतां आपल्याकडे कांही पाश्चिमात्य विद्वान आहेत आणि त्यांनी शोध ( !) लावला आहे की दोन श्रीकृष्ण होते.त्यांची पद्धत म्हणजे सगळ्याचं विघटन करायचं , त्याच्या मुळांतलं परमेश्वरी तत्व समजून घ्यायचं नाहीं , त्या मागील सूक्ष्म घटना पण समजून घ्यायची नाहीं.ते म्हणतात त्याला सोळा हजार बायका होत्या. खरं तर त्या त्याच्या शक्त्या होत्या.आतां एक आई म्हणून मला हजारों मुलं , मुलगे , मुली , पुरुष , स्त्रिया असुं शकतील पण माझ्या चारित्र्याबद्दल कोणी अवाक्षर काढूं शकणार नाहीं. पुरुषांना हे फार कठीण आहे.म्हणून त्याच्या सर्व शक्ति स्त्री-रुपांत जन्मल्या आणि त्यांचा राजाबरोबर विवाह झाला.खरं तर त्या विवाहित नव्हत्या.राजानें त्यांना पळवून तुरुंगात टाकलं.कृष्णानें वाचवलं व नंतर बाहेर काढून त्यांच्याशी विवाह केला.या सगळ्यामध्यें भर विवाहावर होता हे पहा.ह्याच त्याच्या सोळा हजार शक्ती.त्याच्या सोळ्या पाकळ्या आणि सहस्त्रारच्या हजार , म्हणजेच या सोळा हजार शक्ती शिवाय त्याच्या पांच पत्नी होत्या , याबद्दलही लोकांचा आक्षेप , पण या पाच पत्नी म्हणजे पंचमहाभूत तत्वच , याच्यातील मूलभूत तत्वं त्याच्याकडे पत्नीरुपांत आली आणि त्यांच्याशी त्याचा विवाह संपन्न झाला.पण इतकं सारं असूनही तो अलिप्त होता.त्याच्या या अलिप्तपणाच्या खूप कथा आहेत.यमुनेच्या पलीकडच्या काठावर एक फार मोठा ऋषी रहात होता.त्यावेळी यमुना नव्हती तर नर्मदा व तापी नद्या होत्या.त्याच्या राण्यांना त्या ऋषीचं दर्शन घ्यायचं होतं.त्या नदीजवळ आल्या त्यावेळेस नदीला खुप पूर आला होता म्हणून त्या परत श्रीकृष्णाकडे आल्या.त्यानें सांगितले की परत जा , नद्यांना सत्य सांगा म्हणजे त्याच पाणी ओसरेल.तसंच झालं आणि त्यांना आश्चर्य वाटलं. मग त्या राण्या त्या ऋषीकडे गेल्या.त्याची त्यांनी पुजा केली आणि परत यायला निघाल्या तर नद्यांना पुन्हा पूर आला होता.त्या परत ऋषीकडे आल्या आणि पूर आल्याचं सांगितलं.तो म्हणाला की परत जाऊन नदीला सांगा की ऋषीमहाराज उपाशी आहेत आणि त्याला कांहीच खायला मिळत नाही.राण्यांना ऋषी पोटभर जेवल्याचं माहित होतं म्हणून त्याच्या सांगण्याचं त्यांना आश्चर्य वाटलं.तरीही त्या परत नदीजवळ आल्या आणि ऋषीच्या उपदेशांप्रमाणें नदीला सांगितलं.आणि तावडतोब पाणी पुन्हां ओसरलं.त्यांना परत एकदां आश्चर्य वाटलं पण नदी पार करुन त्या परतल्या.

आतां लक्षांत घ्यायची गोष्ट म्हणजे हे लोक अशा उच्च स्तरावर पोचलेले कीं ते खात असले तरी खात नसतात , लग्न झालेलं असलं व तुमच्या आमच्या सारखं काम करत असले व जीवनाचे व्यवहार करत असले तरी त्यापासुन ते सर्वस्वी व पूर्णपणें अलिप्त राहतात.ही अलिप्तता कशी येते मला सांगता येणार नाहीं पण कुंडलिनीचं जागरण झाल्यावर , रोजच्या ध्यानानें , कुंडलिनीकडे पूर्ण लक्ष ठेवल्यास हे नक्कीच शक्य आहे. आणि त्यानंतर सर्व गोष्टींबद्दल अलिप्तता कशी येते , कांही विशेष प्रयत्न न करतां आपली कामं सहज कशी पार पडतात , कितीही काम केलं तरी थकवा कसा येत नाहीं याचं तुमचं तुम्हालाच आश्चर्य वाटेल.या स्थितीपर्यंत तुम्हाला यायचं आहे आणि ती स्थिती प्राप्त झाल्याचं ओळखण्याची साधी खूण म्हणजे "मी" , "माझं" ("हे मी केलं" , "ते मी केलं" , "हा माझा मुलगा" , "हे माझें घर" वगैरे) हे शब्दप्रयोग तुम्ही किती वेळां करता ते लक्ष ठेऊन बघा."मी" या शब्दाचा तुम्ही जास्त प्रयोग करत असाल तर तुम्ही अलिप्त नाहीं असं समजा.म्हणून प्रयत्न करा आणि स्वपरीक्षा करत चला.हे शब्द खरं म्हणजे एक भ्रम असतो. अलिप्त झाल्यावर ती एक अवस्था असते आणि त्या अवस्थेमधूनच तुम्हाला पुढची प्रगति साधायची असते. खाली डोकंवर पाय असं कितीवेळ केलत तरी त्यांतून हे साध्य होणार नाहीं.

श्रीकृष्णाच्या जीवनातुन ह्याच अलिप्ततेचा संदेश मिळतो.अर्जुनाबरोबर तो युद्धाला जायला तयार झाला तेव्हा म्हणाला "मी सारथी म्हणून तुझ्याबरोबर येईन पण हातांत शस्त्र धारण करणार नाहीं , युद्ध करणार नाही." अर्जुनाला तो म्हणाला की केवळ याच अटीवर , मान्य असेल , तर तो येईल.अर्जुन जेव्हां आपल्याच नातेवाईक , गुरु , मित्र यांना युद्धांत ठार मारण्याच्या कल्पनेने गर्भगळित झाला तेव्हा श्रीकृष्णानें सांगितलं की "ते सर्व आधीच मृत झाले आहेत.जन्माला येणारी प्रत्येक वस्तु नाशवंतच असते. म्हणून त्यांना युद्धांत ठार मारणं हे तुझं कर्तव्य आहे." आतां लोक म्हणतील की श्रीकृष्ण हिंसा करायला सांगत होते.पण तसं नाहीं.त्यांच्या म्हणण्याचा अर्थ हा होता की "अधर्मी" पुरुषांना , जे क्रूर आहेत व धर्माच्या परंपरा पाळत नाहीत , ठार मारलंच पाहिजे.तुम्ही त्यांना मारलत किंवा नाहीं तरी ते आधींच मेलेले असतात कारण त्यांनी खूप पाप केलेलं असतं.ते आधीच मेलेले असल्यामुळे तुम्ही त्यांना मारत आहात असं समजणं चूक आहे.कारण त्याचं मरण परमेश्वरानें आधींच ठरवलेलं असतं. नंतर युद्ध झालं. गीतेमधूनही त्यांना काय सागायचं आहे ते लोकांना नीट समजत नाहीं.प्रत्यक्ष

रणांगणावर त्यांनी गीता सांगितली यावरुन त्यांच्या अलिप्त वृत्तीची कल्पना येते.त्यांनी अर्जुनाला प्रथम " बोध " (ज्ञान) घ्यायला सांगितलं , आणि खरा बोध प्रकाशित झाल्यावरच होतो. पण लोकांना हे समजत नाही , त्यांना वाटतं की ग्रंथ वाचून , गीतापारायण करुन , भाषण ऐकून ज्ञान मिळेल.या देशांतही कृष्णावर भाषणं देणारी खुप मंडळी आहेत पण त्यांच्या स्वतःच्या जीवनांत ते अगदी उलट , भयंकर असतात.

आतां श्रीकृष्ण कोणी व्यापारी नव्हता जो हळुहळु सांगतो , त्यानें अर्जुनाला अगदी सरळ-सरळ सांगितलं की तुला स्थितप्रज्ञ - सहजयोगी - व्हायला पाहिजे.

श्रीकृष्ण युद्ध करायला आणि आपलं कर्म करायला कां सांगतो आहे हा अर्जुनाचा प्रश्न होता.हे पण लोकांना नीट समजलेलं नाही.एकदा साक्षात्कार झाला की मगच तुम्हांला ते कळेल आणि तुम्ही तुमचं " कर्म " करु शकाल.त्यांनी स्पष्ट सांगितलं की " तुझं कर्तव्य तूं कर आणि ते कर्म माझ्या चरणी अर्पण कर." जोपर्यंत मी अमुक-अमुक काम करतो आहे ही भावना तुमच्या आंतमधें असते , जोपर्यंत तुमच्यांत हा अहंकार किंवा " मी " पणा शिल्लक असतो तोपर्यंत तुम्ही खुप म्हणाल की " मी हे कर्म तुझ्या चरणी अर्पित आहे " तरी तुम्ही तसं कांही करत नाही. मनुष्यप्राण्याचा स्वभाव इतका सरळ नसतो असं जेव्हां अर्जुन म्हणाला तेव्हां श्रीकृष्णाला त्याची अडचण समजली आणि म्हणूनच धूर्तपणानें त्यानें सगळी कर्मं आपल्या कमल-चरणी अर्पण करायला सांगितलं जे सामान्य माणूस करुं शकत नाही. आजपर्यंत शतकानुशतकें माणूस हा प्रयत्न करत आहे पण त्याला अजून ते जमलं नाही.कारण आपण जे कांही करतो त्याला आपणच जबाबदार आहोत हे आपण विसरुं शकत नाही. आणि म्हणून भगवंताच्या चरणीं आपण कांही अर्पण करुं शकत नाही. खून करुनही ते कर्म देवाच्या चरणी अर्पण केलं असं म्हणणारे लोकसुद्धां असतात.अशा फसवणुकीमुळे लोक आतां देवीच्या नावांखाली प्राण्यांचे खून व तसलेच घाणेरडे प्रकार करु लागले आहेत. पण श्रीकृष्णानें जो उपदेश केला तो आचरणांत आपण साक्षात्कारानंतरच शक्य आहे.तुम्हाला प्रामाणिकपणें जेव्हां वाटतं की तुम्ही कांहीही करत नाहीं तेव्हांच ते कार्यान्वित होतं.आपण एकाद्या सहजयोग्याला जागृति देण्यास सांगतो तेव्हां तो म्हणतो " हे चालू होत नाही." हे काम करत नाही " वगैरे म्हणजे " तृतीय पुरुष " वचनांत तो बोलतो.तोच तृतीय पुरुष बनतो आणि स्वतः काहि करत आहे असं समजत नाही. तो स्वतःच्या हातांनी कुंडलिनी चढवत असतो पण त्याला स्वतःला " मी करतो " असं वाटत नाही , तो म्हणतो " हे चक्र बिघडलयं " , या चक्रावर पकड आहे " वगैरे. अशा प्रकारे त्याचं कर्म (काम करणं) अकर्म (काम न करणं) होऊन जातं. जरी तुम्ही सर्व कांही करत असला तरी तुम्हाला कांही करत असल्यासारखं वाटत नाही. श्रीकृष्णाला वाटलं की कुणीही साक्षात्कार स्वतःला करुन घ्यायला तयार होणार नाहीं.म्हणून त्यानें अट घातली की सर्व कांही देवाच्या चरणांवर अर्पण करा. मग अर्जुनानें " भक्ती " बद्दल विचारलं आणि श्रीकृष्णानें चलाखपणे सांगितलं.आतां मी श्रीकृष्णासारखी चलाख नाहींये , मी सरळ सरळ बोलते.श्रीकृष्णाला माहित होतं की सगळी माणसं फार शहाणी असतात व त्यांना पटवायचं असेल तर सरळ सांगून भागणार नाही.म्हणून तो म्हणाला की फूल , फळ , पाणी वगैरे कांहीही त्याला अर्पण केलं तरी तो त्याचा स्वीकार करेल , पण पुढची युक्ती पहा - ज्याला भक्ती करायची असेल तिथं तिसरं कोणी नको. म्हणजे अनन्य भक्ति.अनन्य म्हणजे " तुझ्या व माझ्या " शिवाय आणखी कोणी नाहीं.म्हणजेच तुझा माझ्याशी संपर्क (संधान) झाला पाहिजे तरच तुला भक्ति जमेल. पण हे कुणाला समजत नाहीं किंवा " अनन्य " याचा अर्थ नीट लक्षांत येत नाहीं.त्याचा अर्थ म्हणजे तुम्ही स्वतःलाच साक्षात्कार करुन घेतला आहे. श्रीकृष्णाला फक्त हीच भक्ती मान्य असते. म्हणून कनेक्शन् होणं फार महत्वाचं आहे , नाहीं तर बरेच प्रश्न निर्माण होतात.आतां हा मायक्रोफोन मुख्य प्रवाहाशी जोडलेला नसेल तर काम करणार नाही.तसंच हे आहे.त्याचप्रमाणें श्रीकृष्ण हे अवतार आहेत म्हणून त्यांच्या बाबतीत कांही नियम , संकेत पाळणं आवश्यक आहे.तुम्हाला मुख्यमंत्र्याला भेटायचं आहे म्हणून मोठ्यानें हाक मारायला लागलात तर तुम्हाला पकडतील. श्रीकृष्ण तर प्रत्यक्ष परमात्मा आहे , म्हणून त्यांच्या नावांचा कसाही एकसारखा जप करुन भागणार नाहीं.अशाचमुळें लोकांनी आपली कुंडलिनी क्षीण केली आहे व त्यांना विशुद्धीचे त्रास होऊ लागले. श्रीकृष्णाचे भक्त असूनही त्यांना हातावर कांही जाणवत नाही , कारण त्यांची भक्ती चुकीची असते.म्हणून श्रीकृष्ण समजण्याकरतां तुम्हाला सूक्ष्मांत जायला हवं आणि त्याच्या म्हणण्याचा भावार्थ समजून घ्यायला हवा. त्याच्या खोड्या , लबाड्या , बालिश चाळे हे सर्व इतकं मनोहर व सुंदर आहे की अबोधिता व आदर आपल्यामधें निर्माण होतो. एखादा भारतीय जेव्हां कुणी लहान मुलाला पाहतो तेव्हां त्याच्या मनांत वात्सल्याची भावना येते , त्याच्याबद्दल त्याला प्रेम व आपुलकी व त्याच्या काळजीची भावना येते. पण पाश्चात्य देशांत मी पाहिलं आहे कीं ते मुलांवर सारखे आघात करत असतात. ते असं का वागतात मला समजत नाही , त्यांच्या हृदयात वात्सल्य हा प्रकारच नसतो फक्त कठोरता असावी. त्यांच्या मनावर कांही भूतबाधा तर झाली

नाहीं ना , का हे त्यांच्या पूर्वजन्माचे संस्कार आहेत ? समजत नाहीं पण एवढं खरं की अशानें त्या लहान मुलांच्या अबोधितेवर किती प्रहार होत असतील ! मनुष्यप्राणी असं कसं करु शकतो याचा उलगडा कधींच होणार नाहीं. म्हणून श्रीकृष्णाच्या या बालिश वागण्यानें तमच्यातील वात्सल्याची , प्रेमाची व संगोपनाची भावना जागृत होते.

आतां श्रीकृष्णाचं आणखी एक वैशिष्ट्य आहे.पांडव त्याचे नातलग होते.द्रौपदी ही त्याची बहिण.श्रीविष्णुमायाने द्रौपदीचा जन्म घेतला.त्याची आई यशोदा.राधाजी महालक्ष्मी होती.मेरीमाता होती.श्रीगणेशांना जन्म दिला जे येशू ख्रिस्त झाले. भारतांत अशा अद्वितीय गर्भधारणेबद्दल कुणाला शंका येत नाही पण इतरांना याच्यावर विश्वास ठेवणं अवघड वाटतं , ते त्याबद्दल वादविवाद करत असतात.भारतीयांचा त्यावर सहज विश्वास बसतो कारण श्रीगणेश अशाच तऱ्हेनें जन्माला आले. आता "रा" - "धा" ही मेरीमाता होती , आश्चर्य म्हणजे "देवीमहात्म्य" मधें येशू ख्रिस्त हे मूलाधार आहेत असं सांगितलं आहे.त्यांचा उल्लेख महाविष्णु असा आहे.ते साऱ्या विश्वाचा आधार आहेत.हे सर्व एकत्र तत्वापासून निर्माण झालेले संबंध आहेत. राधाला त्याचं यशोदेचं नाव द्यायचं होतं म्हणून त्याचं नांव "जेसु" पडलं - हेब्रू भाषेत त्याला "येशू" म्हणतात.उत्तर भारतात "यशोदा" चा उच्चार "जशोदा" असा होतो त्यापासून "जीझस्" नांव झालं. मी काय म्हणते त्याचं तुमच्या चैतन्यलहरींमधून परीक्षण करा.म्हणून ते सारे एकमेकांशी जोडलेलेच आहेत आणि सर्वांत मुख्य म्हणजे ते सारे परमेश्वरी अवतार आहेत. म्हणून त्यांच्याबद्दल अनुमान काढणं,चर्चा करणं किंवा मतप्रदर्शन करणं योग्य नाहीं.असं करणं म्हणजे अहंकाराचं प्रदर्शन करणं आहे कारण तुटपुंज्या ज्ञानाच्या जोरावर परमात्म्याबद्दल भाषणं करणं चुकीचं आहे. ते माणसाच्या बुद्धीच्या व मेंदूच्या आवाक्याबाहेर आहे.म्हणून एकच गोष्ट आपण करुं शकतो ती म्हणजे नम्र होऊन शरण जाणे."इस्लाम" शब्द असाच आला.त्याचा अर्थही "शरण जाणे" आहे. पण ते कुठें शरण जात आहेत त्याचं त्यांनाच माहीत.ख्रिश्चन लोक ख्रिस्ताचे खरं पालन करतात कां ? तसंच हिंदू लोकही सर्वांच्या हृदयांत एकाच परमात्म्याचा अंश आहे या वचनाचं पालन करतात कां ? सर्वांमध्यें एकच आत्मा असेल तर जाती-पाती कुठून आल्या ? जगांत आतां इतके सहजयोगी झाले आहेत ही परमेश्वराची मोठीच कृपा आहे.परमचैतन्याच्या अनुभवामुळें आपण हे सारे कृत्रिम अडथळे पार केले आहेत. चैतन्य लहरीमधें हा छोटा , हा मोठा हे द्वैत शिल्लकच राहणार नाहीं. तुम्हांला फक्त त्या स्थितीपर्यंत उन्नत व्हायला हवं जेव्हां तुम्हाला कळेल की श्रीकृष्णानें सांगितल्याप्रमाणें जग ही एक लीला आहे आणि ती पाहणारे तुम्ही फक्त "साक्षी" आहात.

आज या यमुना नदीच्या निमित्तानें श्रीकृष्णानें केलेल्या अनेक सुंदर गोष्टींची मला पुन्हां आठवण झाली आणि म्हणून मी त्याच्याबद्दल तुम्हाला सांगितलं.शिवाय काल तुम्हाला नाच-गाण्यांत तल्लीन झालेलं पाहून मला फार समाधान झालं.त्यात विशेष गोष्ट म्हणजे पूर्वी हा आनंद घेणारे लोक संत नव्हते तर सामान्य माणसं होती आणि त्यांच्याबरोबर हात धरुन श्रीकृष्ण "रास" करायचे , - "रा" म्हणजे शक्ति व "स" म्हणजे बरोबर , आणि राधाजींच्या शक्तीमुळें ते सर्व जण 'जागृत' होत असत.

आजकाल सर्व धर्मातील मूळ अर्थ व शिकवण बाजूला पडली आहे आणि धर्माच्या नावांखाली भ्रष्टाचार चालला आहे.कारण ती आता फक्त एक मानसिक वृत्ति समजली जाते.जिला साहजिकच मर्यादा आहेत , आणि कालान्तरांने ती क्षीण होत जाते कारण तिच्या पाठीमागें सत्याची शक्ती नसते.याच प्रकारे कला , संगीत वगैरे क्षेत्रातही तसंच चाललं आहे.आतां तुम्हा सर्वांना सत्य समजलं आहे म्हणून यापुढें कृपा करुन हेंहि लक्षांत घ्या की सत्य हे अखंड असतं व सत्य हेच प्रेम. सत्य हे परमात्म्याची प्रेमशक्ति आहे.जिच्यामधून वेगळं असं काही पुढें होणं नाही.तिला कशाची जरुर नसते.ती कांही मागत नाहीं.व तिला प्रेम करणं एवढचं माहीत असतं आणि जेव्हां या सर्वव्यापी परमचैतन्याची कृपा होते तेव्हां कसे चमत्कार घटित होतात याचा तुमच्यापैकी प्रत्येकाला अनुभव आला आहे. तुमचा विश्वास दृढ करण्याकरतां परमचैतन्याची सर्वव्यापी प्रेमशक्ती या सुंदर गोष्टी घडवून आणते.जसे माझे वेगवेगळे फोटो.याचं सगळ्यांत उत्तम उदाहरण या नवरात्रीमधें दिसून आलं जेव्हां मी माझ्या फोटोच्या मागें पडद्यावर एक सुंदर पार्श्वभूमि दिसली.त्या पडद्याच्या मागून गोल आकाराचं सूर्यासारखं कांहीतरी डोकावत असल्याचं दिसत होतं. नंतर मी जेव्हां रशियांत गेले तेव्हां तसाच पडदा माझ्यामागें दिसला. म्हणजे या पडद्याची कल्पना व कृती साकार होण्याच्याही आधी इथे तो प्रकार दिसला. हे त्याच चैतन्यलहरींचं काम सगळ्यांनी मॉस्कोमध्यें हे पाहिलं. ही चैतन्यलहरींची किमया या सर्वव्यापी प्रेमशक्तीतूनच , मी तिथें नसतांनाही , प्रत्ययाला येते.मी नसले तरी मी आहे असा आभास होतो.असे कितीतरी प्रकार घटित होतात.या सर्वांमधून ध्यानांत घ्यायची गोष्ट ही की ज्याला आपण चमत्कार म्हणतो तो खरं म्हणजे या सर्वव्यापी परमेश्वरी प्रेमशक्तीची सुंदर लीला आहे.

# नवरात्री पूजा

२४ ऑक्टोबर १९९३

देवीचे अनेक अवतार आहेत , तिच्यात शक्ती समाविष्ट आहे. आदिशक्ती ही सर्व या अवतारांना शक्ती प्रदान करते म्हणून अनेक देवता आहेत. निरनिराळ्या त्या पृथ्वीवर अवतरल्या व जे साधक आहेत त्यांच्या उद्धारासाठी त्यांनी जे जरुर होते ते केले.विशेषतः जगदंबा , दुर्गा विषयी माहिती आहे.सत्य शोधणाऱ्या साधकांना तिने संरक्षण देण्याची शिकस्त केली तसेच दुष्ट शक्तींचा नाश केला.मानव उच्च अवस्थेला गेल्याशिवाय सत्य जाणूं शकत नाही म्हणूनच हे त्यांचे प्रयत्न म्हणजे निव्वळ मानसिक पातळीवरचे.या मानसिक क्रियेला जर सत्याची आणि धर्माची जोड मिळाली नाही तर त्याचा जोर कमी होतो संस्कृतमध्ये त्याला ग्लानि म्हणतात.ज्यावेळी अशी ग्लानी येते त्यावेळी अवतार समस्या दूर करण्यासाठी जन्म घेतात.

या देवतेच्या अवतारांचेवेळी अनेक दुष्ट शक्ती अस्तित्वात होत्या , त्यामुळे तिला त्यांचेशी झगडावे लागते व त्यांना संपवावे लागते.हा विनाश केवळ विनाशासाठी नव्हता केवळ दुष्ट शक्ती संपविण्यासाठी , तर ह्या दुष्ट शक्ती संतांचे व साधकांचे हनन करण्याचा व त्रास देण्याचा प्रयत्न केला म्हणून.या सर्व शक्ती एकाच वेळी उदयास येतात असे नाही. निरनिराळ्या वेळी आल्या त्यामुळे त्यांना हाताळणे सोपे झाले. अध्यात्मिक दृष्टया जे महत्वाचे लोक आहेत त्यांचे रक्षण करणे त्यांना वाचविणे हे अवतारांचे स्वरुप आहे.तर जे लोक सत्याचा शोध घेत नाही तर ईश्वरी दृष्टीकोनातून ते आले काय गेले काय अशा जीवांचा काय उपयोग.त्यांना काही किंमत नाही ना गौरव ते कांहीच समजू शकत नाही.

ईश्वरी प्रेमाच्या निर्णयद्वारे दोन प्रकारचे लोक आहेत. एक जे सत्याचा शोध घेतात व राहिलेले दुसरे. ते चांगलेही असतील, उत्तम असतील जे चांगले कार्य करतात सामाजिक व मिशनरी कार्य इ.आणि ते जर सत्याचा शोध घेत नाहीत तर त्या प्रकारात मोडत नाहीत. ज्यातून ईश्वरी अवतार होतात. म्हणून साधकाची किंमत त्यांचे महत्व जाणण्याचा प्रयत्न करा. याचाच तुम्हीही शोध घेता, साधकांची प्रतिशत आकडेवारी पाहिली तर ती फारच मामुली. पण हेच अत्यंत महत्वाचे आहे. जसे आपण म्हणू शकतो. अनेक मण लोखंडापेक्षा थोडे सोने किंमतीचे वाटते. याचप्रकारे साधक हा अध्यात्मिक उन्नतीसाठी अधिक महत्वाचा वाटतो. विश्वाची निर्मिती , वातावरण निर्माण झाले , उत्क्रांती घडली कशाकरितां, तर मानवाला सत्य समजले पाहिजे.पण आधुनिक वातावरण म्हणजे एक शापच शुंभ निशुंभ याच्यापेक्षाही घातक त्यातल्या त्यात अगदी वाईट म्हणजे आजचा जडवाद. हा जडवाद तुम्हाला उथळ बनवितो. ज्यावेळी साधक अधिक गहनतेत उतरत असतो मधेच हा जडवाद तुमच्या आड येतो.लोक जे सहजयोग आचरतात ते गहनतेत उतरतात व अंतर्ज्ञान म्हणजेच "आत्मज्ञान" जाणणे त्यांना जरुर वाटते आत्मज्ञान म्हणजे दोन भाग - एक आत्म्याचे ज्ञान व दुसरे स्वतः विषयीचे ज्ञान.

ही स्थिती जी मिळविण्यासाठी लोकांनी अनेक परिश्रम घेतले. हिमालयात जाणे , अंगावर माफक वस्त्र ठेवून थंडीत ध्यान करणे , फळे खावून गुहेत राहणे , मुमुक्षतेची खोल आर्तता असलेमुळे ते सर्व प्रकारच्या तपस्या करत.या ठाव घेण्याच्या ओढीमुळे ते त्याच्याबाहेर कधी पडले नाही. अशा तीव्र इर्षा व समर्पणामध्ये आजच्या आधुनिक काळातील भौतिकता आड येते. जेव्हा ते साधकावस्थेत असतात तेंव्हा ते एकच वेड असते.मी पाहिले की सहजयोगांत येण्याआधी लोकांनी बराच पैसा खर्च केलेला असतो अनेक ठिकाणी हिंडतात , हिमालयात जातात , नेपाळ , जपान इ.ठिकाणी गेलेले असतात. जेव्हां ते आपल्यातील जाणीवेमध्ये वृद्धी होण्यासाठी आत्मप्रवृत्त होतात पण नंतर त्यांची प्रगति कुंठित होते. आणि प्रत्येकाने जाणले पाहिजे की एवढ्या धावाधावीनंतर तुम्हाला काहीतरी मोलाचे प्राप्त

झाले आहे.तुम्हाला त्याबद्दल समाधान वाटते हे ठीक.नंतर तुमची प्रगति ठप्प व्हायला नको.ती थांबण्यामागे भौतिकता ही महत्वाच्या कारणापैकी एक आहे.ही भौतिकताच स्वत:वरील श्रद्धा कमी करते.

तुम्हांला माहित आहे की सर्व देव देवीकडे प्रार्थना करतात.ती अवतरते.सर्व दुष्ट शक्तींचा नाश करते.कारण देवतांची तीव्र इच्छा ज्यामुळे तिला अवतार घ्यावा लागला.एवढी प्रामाणिक इच्छा की त्यापुढे त्यांनी भूक तहान पाहिली नाही.आणि अपार कष्ट घेऊन आपली उन्नती साधत . त्यात दुष्ट शक्ती बाधा निर्माण करत.त्यांची आर्त हाक एवढी अस्सल व प्रामाणिक होती की त्यांना वाचविण्यासाठी त्यांचे रक्षण करण्यासाठी त्यांचा सांभाळ करण्यासाठी देवीला या पृथ्वीवर जन्म घेणे भाग पडले.पण असे आपल्याला वाटते की आपण आपले अंतिम स्थान गाठले आणि आता येथेच स्थिर व्हावे.पण स्थिर व्हावे म्हणजे तुम्ही काय समजता ?

साक्षात्कार मिळाल्यानंतर तुम्ही पूर्णत्वाकडे जाता समग्रतेत उतरता सत्याशी एकरुप होता . पुढे काही करणे जरुर नसते तेव्हा तुम्ही संत होता.संताना कुठल्या जाहिरातीची जरुर नसते.कसलीही जरुरी नसते त्यांचा संदेश पसरतो.लोक त्यांना पाहतात व जाणतात की ते मोठे संत आहेत.काही संत आपल्या घराबाहेर कधी पडले नाही.भारतात एक म्हण आहे की , तुम्ही ज्या गादीवर स्थिर आहात ती कधी सोडू नये.हे गुरुंना लागू आहे.ज्यांना शोध घ्यायचा त्यांनी गुरुकडे जावे.सहासात मैल वर चढावे पण गुरु कोणाला भेटण्यास तयार नसतात.ते तुम्हांला फटकारतील चोप देतील , अनेक प्रकारे तुमची परीक्षा घेतील.अततः आत्मसाक्षात्कार देण्यासाठी एकाद्याचीच निवड करतील.तरीपणा ही ऊत्कटता व उर्मी त्यावेळी दिसून येई.

आता आपण या आधुनिक युगांत सहजयोग स्विकारला आहे.तुम्ही जाणता की तुम्हाला साक्षात्कार मिळाला आहे.तुम्ही इतरांपेक्षां उत्तम स्थितीस आहांत , तुमच्या अनेक समस्या सुटल्या आहेत आणि तुम्ही स्वत:चेच गुरु झालात.त्यामुळे तुमची स्वत:बाबत व तुमच्या जवळच्या लोकांबाबत असलेली जबाबदारी कमी होते कारण तुम्ही स्वत:बाबत समाधानी आहात.

एके दिवशी एका सहजयोगिनीने मला फोन केला की मी डॉक्टरकडे जाऊन आले व त्यांनी परीक्षा करुन मी गर्भवती आहे असे सांगितले तर मी काय करु? अशा किरकोळ गोष्टीबाबत मला विचारतात.तिच्या मुलाचे नांव काय ठेवावे ? हे काय ते काय ? एखाद्या ब्राह्मणापेक्षांही मला त्यात जास्त कार्य करावे लागते. अगदी छोट्या छोट्या गोष्टीबाबत ते चिंता करतात.एखाद्या विवक्षीत मुद्याबाबत काय करावे विचारले तर ते अलाहीदा.त्यांची ट्रेन चुकली तर ते फोन करतील , माताजी आमची ट्रेन चुकली आता काय करावयाचे ? तर मला त्यांना सांगावे लागते की बंधने या. नाहीतर कुणीतरी फोन करतील . श्री माताजी माझे वडीलांना ह्रदय विकार आहे पण ते सहजयोगी नाहीत , आपण काहीतरी करा.मग श्री माताजींनी आपले चित्त त्यांच्या वडीलांवर जे सहजयोगी नाहीत , त्यांच्यावर ठेवावयाचे. अगदी किरकोळ बाबीबाबत मला लिहतील , तुम्ही समजू शकत नाही या अगदी किरकोळ गोष्टी.ते समजू शकत नाही मी येथे कशाकरिता आहे. पण मला बजावून सांगायचे की स्वत:ची आत्मसाक्षात्कारी म्हणून किंमत जाणली नाहीतर तरी मी कधी कुणाला असल्या भंपक गोष्टी विचारु नका असे म्हणत नाही , तुम्ही माझा वेळ वाया घालवता , कधीही नाही.तर माझ्या वेळेचे मोल तुम्हांस समजणार नाही किंवा मी कोण आहे ?

अशा जडतेबाबत असलेल्या कलांमुळे हे अवतरण वाया जाते की काय ? या आधुनिक युगात मानवांत काय बिघडले आहे ते कळत नाही कारण तुमच्या जीवनात उन्नत होणे व त्यात वाढणे हेच महत्वाचे आहे. या सर्वांचा एक व्यापक दृष्टीकोन ठेवा.हे जग का निर्मिले गेले , तुम्हाला मानवाचा जन्म का लाभला , हे सर्व करण्यामागे हेतू काय कशाकरिता हे सर्व केले गेले ? हे सर्व चित्र डोळ्यासमोर ठेवा व तुमची जागा कोठे आहे हे शोधा , मी कोठे आहे ? आणि नंतर परमेश्वराने माझी निवड का केली , की आता सहजयोगी झालो , तर माझ्यावर काय जबाबदारी आहे हे प्रत्येकाने पाहिले पाहिजे. पण उलटपक्षी मी असे लोक पहाते की मला (श्री माताजींना) विचारले पाहिजे.ते फोन उचलतात व सरळ फोन करतात व विचारतील श्री माताजी , मी ही खुर्ची स्विकारु का ? यावरुन हे दिसते की त्यांना स्वत:बद्दल किंमत नाही ना माझ्याबाबत.दोन्ही बाजूंनी असल्या क्षुद्रक व थिल्लर गोष्टी विचारतात तेव्हां समजू शकत नाहीं की सहजयोगी असले प्रश्न का विचारतात.

या पार्श्वभूमीतून तुम्ही देवीकडे पहा , ती निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या स्वरुपात पृथ्वीवर येते , सत्य शोधकांना वाचविण्यासाठी व त्यांची साधना पूर्ण व्हावी म्हणून.कल्पना करुं शकता ? एक मोठा फरक आहे.देवीचा कलियुगाच्या आधी झालेला अवतार.पण आता एक निराळी घटना आहे तुम्ही सहजयोगी होण्यासाठीं या पृथ्वीवर आलात.तुमचे मन शरीर भावना या सर्व अध्यात्माने भरित आहेत.गेली कित्येक वर्षे तुम्ही ईश्वराचा शोध घेत होता आणि तुम्ही येथे आलात हा काय योगायोग आहे ? मग हा काय प्रकार आहे ? तुमच्या साधनेतून तुम्ही सहजयोगात आलात ही तुमचा मोठा फायदा आहे आणि त्याद्वारे तुम्हांला मिळालेले समाधान मग तुमच्यावर कोणती जबाबदारी आहे.

हा पृथ्वीवर साक्षात उतरलेला अवतार तुमचे सरंक्षण व पोषण तर करता पण दुष्टांचा नायनाट ही करतो.नाही , ती तुम्हांला तुमच्या आत जे गहन आहे त्याविषयी सांगण्यास ती पृथ्वीवर उतरली तसेच तुमचे संबंध आतील (तत्वांशी) व बाहेर कसे असावेत तुम्ही सत्याशी कधीही जोडले गेले नव्हते.तसेच सर्व व्याप्त चैतन्याशी तुमचा कधीही संपर्क नव्हता तसेच ईश्वरी शक्तीशीही.प्रत्येकाने समजले पाहिजे की काहीतरी महत्वाचे घडले आहे.माझ्यातील कुंडलिनी शक्तीबाहेर आली व तिचा वरील सर्व चक्रांशी स्पर्श झाला कसा असे कुणीही केले नव्हते. फक्त त्यांचे रक्षण करण्यात आले होते.पूर्ण लक्ष ठेवले गेले असे कुठेही लिहिले नाही की देवीने लोकांना आत्मसाक्षात्कार दिला , कुठेच नाही.ती कारणीभूत आहे , ती देऊ शकते तिच्या एका नांमात असलेप्रमाणे , एक नाही दहा आहेत ज्यात ती निर्वाणपद देणारी आहे , ती तुम्हांला तुमची स्वतंत्रता देते.ती तुम्हांला पुनर्जन्म देते हे सर्व लिहिलेले आहे.पण आता या आधुनिक युगांत असे दिसते की लोकांना स्वत:च्या जीवनाची किंमत किती याचे आकलन होत नाही.

आता बघा लोकांनी विचारलेले प्रश्न कशाप्रकारे लोक चौकशी करतात.ते कशाप्रकारे चिंतीत होतात.आता आमचा मुलगा मोठा झाला मी काय करावे ? तुम्ही काय करावे.मुलगा मोठा झालाय ना घाला शाळेत तुम्हाला जे वाटते ते करा.माताजी कृपया सांगा मुलाला कोठे ठेवावे ? मगच तुम्ही मुलाला ठेवता.तुम्ही शाळा बघितली कां माताजी ? नाही मी नाही. मग तुम्ही जा आणि तपासा. कल्पना करा की कालीमाता करत आहे.हे सर्व बारीक सारीक आई म्हणून करणे आवश्यक आहे.स्वत:च्या अपत्याकरिता सुद्धा एवढे कोणी करणार नाही , की सांगते. पण त्या मुलांकडे पाहिले की ते काय करत असतात ? ते भौतिकतेतच असतात.

आजचा दसरा हा एक महत्वाचा दिवस आहे.या दिवशी रावणाचे दहन करण्यात आले. बऱ्याच ठिकाणी रावणाच्या प्रतिकृती जाळल्या जातात.पण हा रामाचा विजय होता.त्यांनी सहजयोगी नाही निर्माण केले ना कोणाला आत्मसाक्षात्कार दिला तर त्यांनी रावणास मारुन विजय प्राप्त केला.पण हे सर्व आजच्या तयारीसाठी , आजच्या घटनेसाठी केले गेले.आजचे दिवस असे यावे म्हणून हे पूर्वी केले गेले.जेव्हां रामाच्या विजयाचे महत्व आज लोकांना समजते. पण हे घडत नाही. कारण श्री माताजींचे हे अवतरण हे खूप वेगळे आहे , ते मोहक आहे , महामायेच. तुम्हाला जे करायचे आहे , ती मोकळीक दिली आहे.क्षुल्लक गोष्टींकरितां ते माताजीशी संपर्क साधतात , पण महत्वाच्या गोष्टीकरिता नाही.एक गंमत म्हणून याचा उपयोग केला जातो , जे महत्तम आहे , महत्वाचे आहे ते अत्यंत मूर्खपणाच्या गोष्टींसाठी वापरले जाते.

जे अवतार झाले त्यातील फरक पहा. एक अवतार लोकांना वाचविण्यासाठी होतो.मायेतून बाहेर काढण्यासाठी.पण हा दुसरा झालेला अवतार केवळ याबाबत बोलत नाही तर तुम्हाला तुमचा आत्मसाक्षात्कार देतो आणि तुमच्या बारीक सारीक गोष्टींची खबरदारी घेतो. जेव्हा एक स्त्री मला फोन करुन विचारते , मी काय करु ? माताजी कृपाकरुन मला बरे करा. आतांच्या भक्तात व तेव्हांच्या भक्ताबाबत असलेला दृष्टीकोन यात बराच फरक आहे. मी विचारते तुम्ही जे कांही केले त्याबाबत मला कधीच विचारले नाही काही हरकत नाही.आता , तुम्ही जे काही केले असेल , मी तुमच्या मुलाला पाहते.त्याची काळजी घेते त्या बालकाला ठीक करते पण तुम्ही बरोबर या. पण मला कळते की त्या मुलाच्या बंधनातच अडकलेली आहे. आणि मी त्यांच्या लीडरला फोन केला तेव्हां त्याला ते भयंकर वाटले आणि म्हणाला की मी पाहिले ती त्या मुलाच्या भयंकर पाशात अडकलेली आहे.म्हणजे एका मूर्खपणाच्या टोकाकडून दुसरीकडे.

तर या अवताराला अनेक तऱ्हेची कार्ये करायची आहेत.सर्व ६४ कला श्री गणेशाच्या ६४ क्लृप्त्याही याची सोडवणूक करणार नाही.हे सर्व एवढे गुंतागुंतीचे कां ? तुमच्या मिळालेल्या साक्षात्कारानंतर तुमची चाल तुमच्या स्वत:च्या ध्येयाकडे व वृद्धीकडे असायला पाहिजे.आणि हा सर्व मूर्खपणाचा घोळ तुम्हाला कां सतावतो ? तुम्हांला काय हवे ? आपण काय विचारता ? तुम्हाला काय मूल पाहिजे ? खरे तर सहजयोग प्राप्तीनंतर तुम्हाला कशाचीच गरज नाही.तुम्हांला मूल कशाला हवे ? दुसरी खूप मुले आहेत त्यांची तुम्ही काळजी घ्या.मला पाहिजे ? तुमच्या मनातून सर्व संपले पाहिजे "मला हे हवे ते हवे." ही निकड आता संपली. तुम्हांला तुमचा आत्मसाक्षात्कार पाहिजे त्यानंतर ते घडून 'मला पाहिजे' (श्री माताजींना) ते महत्वाचे आहे.

तुम्ही या भौवतीकतेच्या बाहेर पडला पाहिजे. याचा अर्थ नाही की तुम्ही 'हरे राम हरे कृष्ण' सारखे व्हावे कारण ते मुक्त नाहीत.ते पूर्ण अडकलेले लोक आहेत.'मुक्तता' ही अशी स्थिती आहे की तुम्ही कशानेही बद्ध रहात नाही. कशाचेच महत्व नसते फक्त अध्यात्मिक उंची 'हेच महत्वाचे.यापेक्षा दुसरे कशाचे आकर्षण असावे , हे सहजयोग्यांनी समजून घ्यावे.सहजयोग्यांशी तुलना करता इतर लोकांना कशाकशातून पार व्हावे लागले , हे मी जेव्हां वाचते तेव्हां भयंकर वाटते.इथे (सहजयोगात) सर्व सोयीस्कर आहे , येथे येतात.खाण्याची मजा घेतात , चांगली संगत असते. एक प्रकारचा उत्सव चालतो. आणि जर कांही कमतरता राहिली , तर मी एक आहे जी संयोजकांना सांगेन , काय हे ? तुम्ही हे केले पाहिजे होते , ते करायला हवे होते.

आता कशा टोकाशी आपण पोहोचतो आणि आपल्याला जाणले

पाहिजे का आता आपल्याला काय हवे ? शुंभ आणि निशुंभांना ठार मारण्याचा काय उपयोग ! कारण तुम्ही थांबला आहात , तुम्ही एका ठिकाणी चिकटला आहात काही प्रगती नाही. हे सर्व सतत करण्याचा काय उपयोग आणि विरोधी शक्तींचा विनाश करायचा कशासाठी ? याचा हेतू काय ? प्रत्येकजण म्हणतो , श्री माताजी तुम्ही त्यांना परवानगी दिली , परवाना दिला त्यामुळे ते आहेत ते अशाप्रकारे आहेत.एके दिवशी एक मुलगी माझ्याकडे आली तिचे मूल आजारी होते.मी विचारते , तू ध्यान करतोस का ? ती गप्पच.मी तिला म्हणाले तू ध्यान करत नाही हे मला समजते कारण काय आहे ते मला कळते.तर आजच्या दसऱ्याच्या महत्वाच्या दिवशी लोक गावाचे सिमोल्लंघन करतात व आपल्या वडील जनांसाठी सोने लुटून आणतात.तर तुम्ही या जडतेच्या , तुमच्यात कार्यरत असणाऱ्या कमीपणा आणणाऱ्या या शक्तींच्या सीमा पार करुन निर्लेप असणारे 'सोने' सहजयोगाच्या कक्षेतून घेऊन या.

तुमच्यापैकी कितीजण कार्याच्या क्षेत्रात आहात ? तुम्ही कितीजण इतर लोकांना याबद्दल सांगता? त्याबद्दल तुम्हीं काय करता? सर्मपणाच्या स्थितीला तुम्ही या.उदा.तुम्हाला समस्या , समजा तुम्हांला रजा मिळत नाही.तुम्हांला तर पूजेला यावेसे वाटते.तुम्हांला पूजेसाठी यायचे तर सरळ या.तुम्हांला नोकरी तर मिळेल बरोबर पदोन्नतीही. पण तुम्हांला स्वतःच्या उन्नतीवर श्रद्धा नाही.तुम्हांला मुद्दाम निवडण्यात आले आहे हा विश्वास नाही.

आता आपण कोठे आहोत ? आम्ही ते लोक आहोत , सर्व शक्तीसह आम्हीं आशिर्वादित आहोत.आमच्यावर कृपा झाली , पण ती सरावात येत नाही आम्हांला ज्या शक्ती प्राप्त झाल्या त्याचा आम्ही कधी अंदाज घेऊ इच्छित नाही.आम्हाला आमच्या मुलांची चिंता वाटते , आज कुठली साडी नेसायची याविषयी चिंतेत असतात वा आपल्या प्रमुखाविषयी चिंता करतात किंवा नेतेपदाविषयी काय करावे ? या सर्व निरुपयोगी गोष्टी आहेत.याकरितां तुम्ही येथे आला नाही.तुम्ही जाणून घ्या की येथे आलो ते आत्मस्वरुप होण्यासाठी आणि त्या आत्म्याचा प्रकाश प्रसारित करण्यासाठी एकदा तुम्ही हे करायला लागला की कशाचीच हरकत वाटत नाही आणि आपलीच श्रद्धा कशी कार्यान्वित होते याचेच तुम्हांला नवल वाटेल.ही श्रद्धा खोटी नाही.त्याविषयी तुम्ही मला काही सांगण्याची जरुरी नाही.सर्व कार्य आपोआपच घडते.ही काही दिवसांची बाब आहे ज्या तुमच्या तीव्र इच्छा होत्या , त्याचे परिणाम तुम्हांला दिसतील. भौतिक उथळ गोष्टी प्राप्त होतील तरीही प्रश्न उरतो.उदा.एखाद्यास आपले जीवन सहजयोगासाठीं समर्पित करावे असे वाटते.तेव्हां तुम्हीं काय करता ? तुम्हांस समर्पण करायचे तर तुम्ही काय करता ? प्रथम म्हणजे तुमची श्रद्धा , एखाद्या गोष्टीवर आपली किती श्रद्धा आहे.तुमचा पूर्ण विश्वास आहे किंवा नाही.तुमचा विश्वास नाही तर त्याबाबत काय केले ? या स्थितीत तुम्हीं आत्मनिरीक्षण करा आपण काय करत आहोत.काय करायचे आहे आपल्याला कोठे पोहोचयाचे आहे ?

ही वेळ फार महत्वाची आहे.तुम्ही अती महत्वाचे आत्मे आहांत तुम्ही स्वतःबद्दल व स्वतःच्या पद्धतीबद्दल किंमत ठेवत नसाल , तर परमेश्वराने तुमची का चिंता करावी ? त्याने तुम्हांला नवीन कल्पना का द्याव्यात ? मग तुमच्याबाबतीत त्याने का रस घ्यावा , अशा प्रकारच्या व्यक्तीमध्ये. आपल्या आंत पहा परीक्षण करा सहजयोगासाठी आपण काय केले ? माझ्या लहान मुलांना सांभाळणे, नवऱ्याकरितां जेवण तयार करणे याशिवाय काय एवढेच.पुरुषांनीसुद्धा या रितीने विचार केला पाहिजे आपण काय केले ? सहजयोगासाठी काय केले ? मला या पुढाऱ्याला भेटायचे , या व्यक्तीला भेटायचे आहे ? पण कशाकरिता ? ते स्वतः होऊन तुमच्याकडे आले पाहिजे.पण तुमचा स्वतःवरच स्वतःचा विश्वास कमकुवत आहे.या पतनासाठी मला वाटते हेच कारण आहे.स्वतःवरील विश्वास.

विश्वास ही खास चीज आहे.ती तशी आहे तुम्हांस ठाऊक आहे.तुम्ही माझे फोटो पाहिलेत त्यावरुन तुमची खात्रीही झाली आहे.आणखी खात्री करायची जरुरी नाही.पण ही श्रद्धा तुमच्या हृदयांशी निगडीत आहे कां ? तुमच्या आंत ती तुमच्याबरोबर आहे का ? ती बाह्यतः आहे. ठीक आहे , माताजी हे करतील.श्री माताजी (प्रश्न) सोडवतील , माताजी हे करतील. पण आता एकंदरीत चित्र असे दिसते की तुमच्याकडून बळजबरीने काही तपस्या करुन घेतली पाहिजे.एखाद्याला विचारा तुम्ही ध्यान करता का ? नाही माताजी , मग येथे काय करता ? 'माझे गुडघे दुखतायत म्हणून तुमच्याकडे आलोय.मी ध्यान करत नाही ? पण मी प्रामाणिक आहे मग यात नुकसान कोणाचे.माझे नाही मला सहजयोगाची गरज नाही , तुमच्या सहजयोगासाठी मी परिश्रम घेते.तुम्ही काय करता , कशाकरितां तुम्ही परिश्रम घेतले ?

तुम्हाला तुमचा साक्षात्कार मिळाला , तुम्ही तुमच्या आकलनाच्या विशाल अवस्थेत पोहोचला , तुमच्या अंर्तज्ञानाविषयी तुमचा आत्म्याशी व ईश्वराशी असलेल्या संपर्काविषयी. हे तुम्हाला माहित आहे. तरीसुद्धा ते पाहिजे तसे नाही , जे तुमच्या हृदयापासून तुमच्या आर्त आकांक्षातून प्रतीत व्हावे. स्वतःशीच फसवणूक करुन कोणाचाच फायदा नाही. मी काही हे उगीचच व्यक्तीकरितां बोलत नाही. मी तुम्हां सर्वांकरितां सांगत आहे. स्वतःशी प्रतारणा करु नका.तुमचे उद्देश मोठे आहेत म्हणून येथे आहात. हा उद्देश म्हणजे स्वतःला बरोबर करणे व स्वतःच्या मनाला मूर्खपणाच्या

विनाशकारी शक्तीपासून मुक्त ठेवणे , त्याचा प्रसार करणे व त्यावर भाष्य करणे. माझी अशी खात्री झाली की सहजयोग्यांचा बाबतीत काहीतरी असे घडावे की आपल्या आंत जे घटित झाले , जे शक्तीमान आहे.त्याचा फक्त उद्रेक बाकी आहे , याची त्यांना जाणीव होणे महत्वाचे आहे.हीच ती जबाबदारी , मग तुम्ही ज्यू किंवा ख्रिश्चन किंवा आणखी कोणी त्यामुळे काही फरक पडत नाही , ते सर्व बाह्यातून आहे कशाकरितां हे तुम्हांला घडवायचे ! तुम्ही जाणीवेच्या नव्या आयामात आला आहात.आपल्या आतल्या स्वविषयी तुम्ही ज्ञान असून उच्च अशा जीवदशेत आला आहात.सर्वकांही , हे जाणून सुद्धा , तुम्ही वृद्धींगत जर झाला नाही तर तो दोष कुणाला लावणार ?

आता आपण अशा टोकावर आलो कीं कलियुगाचे महत्व जाणले पाहिजे ज्यावेळी तुमची आई तुम्हांला मदत करण्यास तत्पर आहे , तुमची हळुवारपणे जपणूक करीत आहे , सर्वकांही गोडपणे सांगत आहे.खरे तर एक मिनिटांपेक्षां जास्त मी कोणांवर राग धरु शकत नाही.सर्वकाही गोड भाषेत समजावते , तुम्ही काय करायला हवे होते , काय तुम्ही करु शकता आणि काय करायचे आहे.हे सर्व सतत तुम्हांला सांगत आले आहे , तुम्हांला अगदी गोडीत एकत्र केले आहे आणि अगदी समजावून सांगत आली की ही तुमचीच स्वतःची आतील शक्ती आहे.तिची तुम्ही जपणूक करा , स्तुती करा. हे तुम्ही अनेक तऱ्हेने समजू शकता , पुस्तकांतही सापडेल.हे आंतरिक ज्ञान , याबाबत की असे म्हणते.मला याबद्दल आंतरीक ज्ञान आहे. तेव्हा म्हणू की ह्या गोष्टी जमवायच्या किंवा बांधायच्या कशा पण मी ते करणार नाही.हे अगदी त्यासारखे सोपे आहे.मी ते करत नाही.मला अंतर्ज्ञान आहे ठिक आहे मी पी.एच. डी.आहे.पण मी मूर्ख आहे.हे असे झाले की बरेच लोक मानसिक दृष्ट्या सहजयोगामधे पूर्णपणे तयार झालेले आहे. हे मला माहीत आहे. परंतु जेथे सहजयोगाचे आचरण करायचा प्रश्न येतो ते तेथे नाहीत म्हणून मी आता तुम्हाला इशारा देत आहे हे असेच झाले की जसे ख्रिस्तांनी म्हटले." , काहि बीया टाकल्या ज्या रस्त्यावर पडल्या.सुकल्या आणि नष्ट झाल्या,त्यांचा अंकुर फुटला नाही." तेव्हा आता सातत्याने तुमची परीक्षा घेतली जात आहे.

रोज रात्री तुम्ही ध्यान केले पाहिजे आणि नंतर तुम्ही याबद्दल विचार केला पाहिजे की मी आज संपूर्ण दिवस काय केले ? काय मिळविले ? येथे प्रत्येक गोष्ट वेळेच्या बंधनात होते. ती पण फालतु गोष्टींना महत्व देऊन , पण काय करायचे आहे तर तुमचा विश्वास.मी ज्या कांही गोष्टी करणार आहे त्या सत्य असतील , ज्या अर्थपूर्ण असतील (हि पूजा) तुमच्या उजव्या बाजूसाठी असतील कारण तुम्ही श्रीरामाची आणि त्यांच्या धनुष्याची पूजा करता आणि प्रत्येक गोष्टीची. परंतु ह्या अवतरणाचा विचार करा. चौदा वर्षे ते ठराविक कारणासाठी वनवासाला गेले.एखाद्याला एक वर्ष लांब ठेवले तीं सुद्धा डोके दुःखी आहे. हे तुरंग नाही तर ज्याला आपण म्हणू की ज्या वनात ते गेले.ते त्यांना तुरुंगासारखेच होते.ते राजपुत्र होते.त्यांना राहायला जागा नव्हती.ते जेथे जेथे गेले तेथे त्यांना रहायला स्वतःला झोपडी बांधायला लागली.त्यांना ते करावे लागले.श्रीरामांनी ते का केले ? कारण त्यांना स्वतःवर पूर्ण विश्वास होता. ते श्रीराम होते. त्यांना असे करण्यात आनंद वाटत होता. त्यांना स्वतःवर तसेच देवावरही विश्वास होता की ते जे काही करत आहे ते म्हणजे देवाचीच इच्छा आहे.आणि त्यांनी ते केले , पूर्ण केले , बस , त्यांनी कधी चिंता केली नाही की त्यांना रावणाला सामोरे जावे लागेल किंवा अमक्या तमक्या गोष्टींशी सामना करावा लागेल.

मी सहजयोगी आहे , मी कसली चिंता करत नाही. माझे काम सहजयोगाचा प्रसार करायचे आहे , माझे काम स्वतःला स्वच्छ करण्याचे आणि मला स्वतःला जाणण्याचे आहे. हे माझे काम आहे. माझी नोकरी आहे मला ते केले पाहिजे , मला त्याबद्दल चिंता करायची नाही की मला शाळेत प्रवेश मिळेल किंवा नाही.मला त्याची चिंता नाही.जर कोणी विमानाने जाणार असेल तर त्याला तिकीट मिळेल अथवा नाही.तुम्ही विश्वास करणार नाही. पण जर तुम्ही तुमचावर विश्वास ठेवला तर तुम्हाला शाळेत प्रवेश मिळेल.विमानाची तिकीटे मिळतील.जे तुम्हाला पाहिजे ते मिळेल.हे सगळे आहे.ह्याच्यासाठी तुम्हाला झगडा करावा लागणार नाही. तुम्हाला त्याची चिंता नको. माझ्या जीवनात हे सगळे घडलेले आहे. हो माझा विश्वास जिब्राल्टर च्या खडकाप्रमाणे दृढ याबाबत प्रश्नच नाही कारण मला माहित आहे.मी कोण आहे ते आणि मला माहित आहे मला काय करायचे आहे. मला काहीच प्रश्न नाही. फक्त माझा विश्वास मला माहीत आहे प्रत्येकाला मी ओळखते आणि मी पक्ष्यानांही उडवू शकेन.पण मी ते दाखविणार नाही. काही वेळेला मी म्हणेन. ठिक आहे हे छान आहे.पण मला हे पक्के माहीत आहे. मी काय आहे आणि मला काय करायचे आहे.

त्याचप्रमाणे तुम्ही स्वतःला जाणले पाहिजे कारण तुम्ही एका वेगळ्या प्रतीचे लोक आहात.तुम्ही ते नाही की ज्यांना देवाचे संरक्षण हवे , ज्यांना आईचे संरक्षण हवे , नाही. तुम्ही दुसऱ्यांना संरक्षण दिले पाहिजे , तुम्ही त्यांना प्रकाश दिला पाहिजे.तुम्ही त्यांना रस्ता दाखविला पाहिजे , तेव्हा तुम्ही येथे ह्यासाठी आहात.तुम्ही येथे घरासाठी , IncomeTax च्या

सवलती साठी नाही आहात.ह्या सर्व फालतू गोष्टी विसरल्या पाहिजेत. मजा लुटा की ते सर्व तुम्हाला सवलती देतील.हे अगदी असे आहे.जेव्हा मी प्रवास करते , तेव्हा मी विचारसुद्धा करत नाही की मी प्रवास करत आहे.मी फक्त विचार करते मी तेथे आहे वस्स.

तुम्हाला तुमची बोलण्याची पद्धत , शैली , आणि आपली समज अशी पाहिजे की तुम्ही कडक आहात जोपर्यंत तुम्ही स्वतःशी संबंधित आहात.पण दुसऱ्यांशी तुम्ही , दयाळू , गोड व प्रेमळ असले पाहिजे. एकदा आमची बदली झाली आणि आम्ही एका घरात गेलो परंतु तेथे झोपायला काही नाही . तेथे फक्त एक पलंग होता ज्याच्यावर माझे पती झोपले होते. मी म्हटले ठिक आहे , चला एक आव्हान स्विकारु आणि मी फरशीवर झोपले.दुसऱ्या दिवशी माझ्या अंगात दुखले नाही.मी माझ्या शरीराला सांगितले की तुला दगडावर सुद्धा झोपता आले पाहिजे आणि मी एक महिना जमिनीवर झोपले.तुम्हाला तुमच्या शरीराबद्दल आणि मनाबद्दल कठोर असले पाहिजे जे तुम्हाला भौतिकतेकडे आणि आत्म्याच्या अंधोगती कडे नेते.नवीन दिशा शोधते.आणि शेवटी तुम्ही अशा स्थितीला येता की जेथे तुम्ही भौतिक जीवनाचा आणि मानसिक जीवनाचा विचार करत नाही किंवा ज्याला पवित्र जीवन म्हणा किंवा काहीही परंतु तुम्ही विचार केला पाहिजे ठिक आहे.तुम्ही त्यांच्यापासून मुक्त आहात आणि तुम्ही स्वतंत्र आहात तुम्ही काहीही करु शकतां जे तुम्हाला आवडेल.समजा तुम्ही त्या स्थितीला पोहोचलात , तुम्ही फक्त वसा आणि त्या स्थितीला पोहोचा , वस्स.

पण आपण हे कसे दाखवणार , पुरावा काय की आपण त्या स्थितीला पोचलो आहोत , हे दाखविले पाहिजे.सहजयोग्याला सुद्धा हा विचार करण्यासारखी गोष्ट आहे की तो एक जुना सहजयोगी आहे. मी ते समजत नाही ते काय आहे ? सहजयोगात मोठेपणा कसा असेल ? हा मोठेपणा नाही प्रश्नच नाही आता आपण असे समजू कोणीतरी समुद्रात प्रवेश केला. तेथे काही जण आहेत की ते बराच काळ त्या टोकावर पृथ्वीला धरुन थांबलेले आहेत कारण ते त्यात पोहायला घाबरतात आणि काही जण की जे कालच आलेले आणि त्यांनी समुद्रात उडी मारली पोहले आणि पुढे गेले तर हे कसे.! तेच मोठे.सहजयोगात आपल्याकडे असा मोठेपणाचा प्रकार नाही.

आणि दुसरी गोष्ट की ज्यापासुन आपण खूप सहन करतो , हे नेहमीचे आहे की "श्रीमाताजी असं म्हणतात." कोणीही म्हणेल , श्रीमाताजी मला म्हणाल्या , त्यांना मला बोलविले , सांगितले.त्या काय म्हणाल्या ? अरे , तुम्ही तर खूप मोठे सहजयोगी आहात.तुम्ही हे आहात , तुम्ही ते आहात.आता जेथे दोन शक्यता आहेत.एक स्त्री त्याची परीक्षा बघण्यासाठी म्हटले असेल. मी महामाया आहे किंवा मी त्याच्या अहंकाराला धक्का देण्यासाठी सुद्धा म्हणाले असेल जेणेकरुन तो सहजयोगात यावा. श्रीमाताजी म्हणाल्या , तुम्ही खुप मोठे सहजयोगी आहात , अशा गोष्टी सहजयोगामधे , तसेच खुप बढाईचे शब्द , भाषा तो वापरेल.सहजयोग्याचे शहाणपण त्याच्यात नसावे जो ते बोलतो तर त्याने सहजयोगात काय मिळविले.मी असे अनेक सहजयोगी बघितले आहेत की अतिशय गर्विष्ठ आहेत आणि स्वतःला खूप मोठे समजतात.मी अशा प्रकारचे खूप सहजयोगी बघितले आहे की जे खूप गर्विष्ठ आहेत आहे आणि त्यांचा मोठेपणा दाखविण्याचा प्रयत्न करतात की ते किती मोठे सहयोगी आहेत.हम्टी , डम्टी असे ते ज्याला म्हणतात.

ठिक आहे.पण जे सहजयोगी ह्यांच्यासारखे नाही त्यांचे काय ? त्यांची पद्धत अशी ते फक्त बघतील आणि ते या सर्व गोष्टींना साक्षी राहतील. मजा लुटतील आणि हसतील.काय चाललंय ते बघुन हा माणूस असं काय म्हणतोय , त्याचा असा बोलण्याचा विचार काय ? जो माणूस सहजयोगी आहे तो हिरा आहे , कोठेही गेला , कोठेही नेला , लोक म्हणतील हा हिरा आहे.माझी स्वतःची अशी पद्धत आहे की जेव्हा मी एका माणसाला किंवा सहजयोग्याला पाहते. पहिली गोष्ट मी माझ्या अंतरात जाते आणि त्या माणसाला एका वेगळ्या विचारातुन आणि मानसिक दृष्टया बघते.कारण या सर्व शक्ती तुमच्यामधे सुद्धा असतात ही फक्त माझी शक्ती नाही , फक्त तुमच्यात आणि माझ्यात एवढाच फरक आहे की मला माझ्या वर पूर्ण विश्वास आहे आणि तुमचा तुमच्यावर नाही.

आपण एका आडव्या रस्त्यावर आहोत येथे आपल्याला समजले पाहिजे की कोण वर जाईल आणि कोण खाली येईल , तुम्ही शोधले पाहिजे की कोण ते थोडेतरी मिळविणार आहे.मी त्या माणसांशी कसा वेगळा आहे असे म्हटले पाहिजे की मी भोगले आहे , की मला ते केले पाहिजे , देवाच्या इच्छे सारखे नाही आता हे काय आहे , सहजयोग्याचे काय होईल , तुम्ही कसे ओळखाल सहजयोगी कोण आहे.तुम्ही कसे ओळखणार तो ओठ हालवतोय.फक्त एकच गोष्ट की तुम्ही त्यात उतरा , आरश्यासारखे व्हा आणि तुम्हाला बघा की तो कसा माणूस आहे आणि तुम्हाला बघा तुम्ही काय आहात ? आजच्या भाषणांत आपण एक समजले की आपल्या जीवनाप्रती आपले काय महत्व आहे.आपण समजले पाहिजे की आपण या पृथ्वीवर कशासाठी आहोत , आपले काम काय , आपल्याला काय मिळवायचे आहे ह्याच बरोबर मी हृदयापासून आशिर्वाद देते.मला वाटते तुम्ही ते देव ईश्वराच्या इच्छेचे किरण म्हणून स्वीकारा. तुम्ही हे समजण्याचा प्रयत्न करा की तुम्ही कोणत्या महत्वाच्या युगात जन्माला आलात आणि तुम्ही एक सुंदर व्यक्तीमत्व बनलेले आहात.

तुम्हांला अनंत आर्शिवाद.

# महाकाली पूजा

पॅरिस, ११ जुले १९९३

आज आपण देवीची पूजा करायचं ठरवलं आहे.आज यावेळीं आपण श्री आदिशक्ती , कुंडलिनी , सरस्वती किंवा महालक्ष्मी यांच्याबद्दल न बोलतां 'महाकाली' बद्दल बोलणार आहोत.याच देवतेनें सर्वांत प्रथम श्रीगणेशांना गौरीस्वरुपांत प्रस्थापित केलं. तीच श्रीमहालक्ष्मी आणि श्रीसरस्वती या देवताचं पूर्ण स्वरुप आहे.तिच्यामधूनच या सर्व शक्तींचा आविष्कार होत असतो.तीच आपल्यामधिल परमेश्वर - प्राप्तीच्या इच्छेमागें असते.तिच्यामधूनच सर्व इच्छा निर्माण होतात.त्या सर्व इच्छांचा आपल्यामधून आविष्कार होत असतो व त्यानंतर आपल्यामध्यें त्या इच्छांबद्दल प्रतिक्रिया निर्माण होते.

मानवाची सर्वप्रथम मूलभूत इच्छा म्हणजे स्वत:चे उदरभरण. ती आपल्याला हीच देवता देते.आतां आपल्याला या जगामध्यें जगण्याकरितां किमान भूक भागवणं आवश्यकच आहे , तुम्ही हेंहि पाहिलं आहे की ही भूक जेव्हां एका मर्यादेपलीकडे जाते तेव्हां आपण त्या भुकेचेच गुलाम बनतो आणि मग कितीही खाल्लं तरी त्यातुन समाधान मिळत नाही. पण ही इच्छा तुमच्या अहंकारामधून कार्य करायला लागल्यावरच ती पुरी झाल्याचं तुम्हाला समजतं. हे खाद्य - पदार्थ तयार करुन तुम्हाला देणारे हॉटेलवाले लोकही त्याचाच विचार करत असतात , मग ते सर्व तुम्हांला पसंत पडावे म्हणून आकर्षक पद्धतीनें मांडून तुमच्या मनासारखे आणून तुमच्यासमोर ठेवतील.तुम्हाला कसं खुष ठेवायचं हे ते चांगलं ओळखतात आणि त्यामुळें तुम्ही पण भाळून जाता.अशा तऱ्हेने ही इच्छा तुमच्या अहंकाराच्या प्रभावात येते आणि हीच इच्छा सामुदायिक झाली व सामुदायिक अहंकारातून प्रगट होऊ लागली की तुम्ही जणु एक आधुनिक मूर्ख बनता.म्हणजे अहंकार जर बाजूला पडला तर लोक दुसऱ्यांना खुष करण्यासाठी त्यांना जेवूं घालतील. या इच्छेतून प्रतिक्रिया होऊन श्रीमहाकालीच्या आशिर्वादानें एक नविन इच्छा निर्माण होते ती अशी कीं दुसऱ्याला जेवण घालून तृप्त झालेलं बघणं तुम्हाला आवडूं लागत.तुम्ही स्वत: जेवण बनवून दुसऱ्याला प्रेमाने पोटभर जेवण दिल्यानें तुम्हाला आनंद होतो. हे नुसतं बघूनही तुम्हाला समाधान मिळतं.आतां नुसतं खायचंच म्हटलं तरी कितीही प्रकारचे जिन्नस खाऊनही पुरे असं कधीच वाटणार नाही. आतां पाश्चात्य लोकाचं बघा , त्यांच्याकडे मुलांनाही 'तुला काय पाहिजे आहे' असं विचारायची पद्धत आहे.पूर्वी आपल्याकडे जेवण घरातल्या सर्वांसाठी बनवीत असत.पण आतां तसं नाहीं , आता मुलालाही "तुला काय हवंय्" असचं तुम्ही विचारतां.मग तो म्हणाला "मला अमुक हवय्" आणि ते तुमच्या फ्रीजमध्यें नसेल तर विचारायलाच नको.त्या मुलाला एखादा विशिष्ठ पदार्थच हवा असेल तर त्याला , त्याच्यातील अहंकाराला , तुम्ही कसं समजवणार ? अशामुळें आपणच मुलांमधील अहंकार वाढवतो.तर अशा वेळी तुम्ही त्याला सांगायला हवं "आज हेच बनवलं आहे , हे चांगलंच आहे आणि तेच तूं खा." आई-वडिलचचं हे कर्तव्य आहे की मुलांना ऊठसूठ काय हवं असेल ते पुरवून त्यांचा अहंकार वाढू देऊ नये.त्यांनी काय घ्यायचं हे तुम्हांला समजलं पाहिजे.

या देवीची कृपा ही आहे की दुसऱ्याकरतां कांही करण्याची शुद्ध इच्छा ती तुमच्यामध्यें निर्माण करते. त्यातूनच मग भुकेलेल्या उपाशी माणसांबद्दल तुमच्यामधे अनुकंपा येते , ते उपाशी का राहिले याचा तुम्ही विचार करु लागता. आतां याच्या अगदी उलट प्रकारचे लोकही असतात ज्यांना आपण इतकं खाणं चांगलं नाही असंच सारखं वाटतं , म्हणजे उपाशी राहून त्याग करण्याची नसती खटपट करणारे.जेवढं जरुरी आहे तेवढं अन्न-सेवन प्रत्येकानें केलंच पाहिजे. असल्या उपास-तापासाच्या कष्टांमध्ये काहीही शहाणपण नाही.आणि लोक जेव्हां या नसत्या उपाधींच्या मागे लागतात तेव्हां त्यांना दु:ख व त्रासच भोगावा लागतो आणि कालांन्तरानें ते कमालीचे दैववादी व रागीट स्वभावाचे बनतात.म्हणजे भुकेलेला आणि अती खादाड माणूस दोघेही सारखेच.त्यांतही भुकेलेला जास्तच वाईट.

दुसरी एक इच्छा (वासना) तुमच्या मनांत येते ती ही की सर्वांनी तुमच्यावरच प्रेम करावं असं वाटणं.त्यामुळे तुम्ही एक चांगली व्यक्ती बनत असता म्हणून.चांगुलपणा प्रत्येकाला आवडतोच हे तुम्ही जाणता , म्हणून प्रत्येक माणूस दुसऱ्याशी चांगुलपणानें , गोडपणानें वागतो. दुसऱ्याला खुष ठेवलं की ते आपल्याबद्दल चांगलं बोलतील , आपण त्यांना आवडू असं त्यांना वाटतं.पण मग याचाच अतिरेक होऊ लागतो आणि मग तुम्ही त्या सवयीचे गुलाम होता.त्यांतून तुमच्या वागण्यांत एक तऱ्हेची कृत्रीमता येते , इतकी की मग लोकांना समजतं की हा माणूस खोटं बोलण्याचं नाटक करतोय आणि आपल्याला नुसतं खुष करण्याचा आव आणतोय.कुठलीही अपेक्षा न ठेवता , स्वत:चा फायदा करुन घेण्याची भावना न बाळगून तुम्ही जेव्हा अलिप्तपणें एकाद्याला खुष करतां , तेव्हां ती शुद्ध भावना असते.ते चांगलंच आहे.पण एकाद्या व्यक्तीकडून आपल्याला कांही फायदा मिळणार आहे म्हणून जर त्याला खुष करायच्या मागें लागलात तर तुम्ही कमालीचे ढोंगी ठराल , आणि मग तुम्हाला कोणी विचारणार नाही , लोक तुम्हाला हसतील , तुम्हाला वेड्यात काढतील.आणि खुष तर मुळीच होणार नाहीत.कारण तुमचं ढोंग त्यांना माहीत असतं , कुठल्यातरी स्वार्थाकरतां किंवा काहीतरी उकळण्याकरतां तुम्ही असं वागतां हे त्यांना माहीत असतं. तुम्ही खऱ्या चांगुलपणाच्या भावनेंतून हे करत नसता.जो माणूस खरोखरच चांगला आहे तो लोकांना आवडणारच , त्याच्यासाठीं त्याला वेगळं असं काही मुद्दाम करायची जरुरच नसते.त्याचा मुळांतला स्वभावच असा असतो.त्याची धारणाच अशी असते कीं सहजच तो लोकांना आवडतो. आतां ही देवी काय करते बघा. ती सत्य

त्यांच्यासमोर आणते , स्वार्थापोटी तुम्ही करत असलेली धडपड कळणार नाही हे दाखवून देते.काही एका मर्यादेपर्यंत चालेल पण मग ती त्यांचं खरं स्वरुप उघडं करते.असं झालं की मग आश्चर्यचकित होऊन ते विचार करु लागतात की "मी कसा फसलो ? कसं माझं बिंग बाहेर पडलं ? लोकांना हे कसं कळलं ?" हेच महाशक्तीचं कार्य आहे. चुकीची गोष्ट , ढोंग , असत्य असेल ते सर्व ती उघडकीस आणते.

आतां तिसरी गोष्ट , आजकाल लोक भौतिक वस्तूंच्या मागें लागतात ज्यामुळें हा भौतिकवाद सुरु झाला आहे.पण याला अंत नाहीं , हवी असलेली एकादी वस्तु मिळाली तरी त्यांतून तुम्हाला समाधान मिळणार नाहीं - आणि खरं म्हणजे वस्तु मिळाल्यावर त्याच्यांतुन आनंद कधीच होत नाहीं - हा मनुष्य - धर्म आहे आणि माणसांच्या या अपुरेपणांतूनच अर्थशास्त्र जन्माला आलं - अर्थशास्त्र असं म्हणतं की माणसाच्या साधारण गरजा कधीच संपत नाहींत. म्हणून आपण एका पाठोपाठ दुसऱ्या वस्तूंच्या मागें लागतो आणि उद्योजकांचे गुलाम बनून जातो - हें इतकं वाढतं की त्यांत आपण स्वतःचं व्यक्तिमत्व पूर्णपणें हरवून बसतो.लोकांना डोकं नसतं म्हणून ते असं करतात.पण सहजयोग्यांना महाकाली शक्ती मिळतें आणि ती त्यांना शिकवते - उदा." हा ड्रेस तुला शोभून दिसेल , ठीक आहे , हाच सगळ्यांत चांगला आहे.हाच घे." तुमचा प्रश्नच मिटला. ड्रेस , केशरचना इ.तऱ्हेवाईक बाहेरील वस्तुमधून दुसऱ्यावर छाप पाडण्याची इच्छा तुमच्या अहंकार वापरण्यामधून येते.हे चुकीचं आहे.अहंकारामधून फक्त मूर्खपणाचं प्रदर्शन होते.लोकांना चांगल्या गोष्टी सांगणं खरं तर अवघडच , वाईट गोष्टी लोक पटकन् उचलतात.उदा.मी सगळ्यांना सांगते की डोक्याला रोज - नाहीं तर मधूनमधून आंघोळीच्या आधी तेल लावत जा.इथें टक्कल पडलेले खूप लोक मी पाहते.मग आतां मी काय करणार ? एवढी साधी गोष्ट ,जी तुमच्या संवर्धनासाठीच आहे.त्यांना पटत नाही.पण दुसऱ्या संवयी , ज्या तुम्हांला मारकच असतात , विचित्र , अर्थशून्य गोष्टी ते पटकन् उचलतील. इथेंच महाकालीचं कार्य चालतं.ती काय करते तर तुम्हाला शिक्षा देते.तुमच्या शरीराला त्रास देते.खूप घट्ट कपडे घातल्यानें पायांना त्रास होतो.फाटक्या पॅन्टस् वापरल्यानें सांधे दुखायला लागतात. कुठलीही नियमबाह्य गोष्ट केली तर त्याचा त्रास भोगावाच लागतो.प्रथम या चुकीची शिक्षा होते मग त्या चुकीच्या परिणाम भोगावा लागतो.

अशा तऱ्हेने सरळ साध्या जीवनपद्धतीमुळें पुष्कळ त्रास कमी होतात. आपल्यातील महाकाली शक्तीमुळे आपण उत्तरोत्तर उन्नत होत असतो.इतकं असूनही कधी कधी आपण खाली खेचले जातो.मग महाकाली पुन्हा एकदा जागृत होऊन आपल्याला आपली चूक दाखवते.कसे चुकलो आणि काय लक्षांत ठेवलं नाही ते दाखवते.आणखी एक फार सुंदर काम पण ती करते म्हणजे तुमच्या अकलेची.तुमच्या बुद्धीची परीक्षा घेण्यासाठीं भास निर्माण करते.' भ्रान्तिरुपेण संस्थितः ' - तुमच्या डोक्यांत भ्रम-भ्रांति पैदा करते. मग तुम्ही इतर लोक आजूबाजूची परिस्थिती वगैरे सर्व गोंधळात पडून जाता. मग तुम्हांला कांही समजेनासं होत आणि शेवटी ' मी ही चूक केली ' हे तुम्हालाच समजून येतं.अशी भ्रान्ति निर्माण करुन ती तुमच्या अहंकाराला ठिकाणावर आणते. या भ्रान्तिमुळेंच आपण मृगजळामागें धावल्यासारखे त्यांत गुरफटत जातो.एकदां का आपण आपल्यामधेंच समाधान मिळवलं की मग अशा मृगजळांच्या मागें लागणार नाहीं.अशी भ्रान्ति निर्माण केली नाहीं तर लोकांचा अहंकार इतका वळावेल की सर्व जगाचाच सत्यानाश होईल.आपल्यामधील महाकाली शक्तीची ही अशी किमया आहे.पुष्कळजण माया समजतात.हीच आईची माया , ही माया , ती माया - पण हे सर्व महाकालीचचं काम आहे.ती तुमची परीक्षा घेत असते. पण सहजयोग्यांना हे अवघड नाहीं.सहजयोग्यांची परीक्षा घ्यायला पण ही महाकालीच मदत करते.अशा तऱ्हेनें भ्रान्तिमधून तुमची सुधारणा होते.भ्रान्ति नसेल तर तुमची खऱ्या अर्थानें सुधारणा होणार नाहीं.जर म्हणाले " हें करु नका " तर तुम्हांला ते आवडणार नाहीं.हो , बहुतेक वेळी तुम्हांला आवडतंच म्हणा , पण कधीं तरी आवडणार नाहीं. अशाच वेळी या भ्रान्तिमधून तुम्हाला समजून येतं - " मी कुठं होतो आणि आतां कुठं आहे ? मी असं करायला नको होतं.कशामुळें मला हा त्रास व्हायला लागला ? मला ही दुर्बुद्धी कशी झाली ? " हे सर्व ह्या देवीचंच कार्य आहे.

तिचं आणखी एक कार्य म्हणजे ती तुम्हाला निवान्त बनवते.तुम्ही वैतागलेले असता , थकलेले असता , काय करावं हे तुम्हाला कळेनासं होतं तेव्हा ती तुम्हाला निद्राधीन करते.दिवसभर तुम्ही काम करत राहता. मग शेवटी ही महाकाली शक्ति तुमच्यावर काम करते आणि तुम्हाला , एकाद्या लहान बाळकासारखं झोपवते. त्याक्षणीं आपण स्वतःवर आणि दुसऱ्यावर केलेल्या सर्व चुका अपराधांची तुम्हाला क्षमा केली जाते.तिच्या मांडीवर तुम्ही छानपैकी , निवान्तपणानं झोपुन जाता आणि तुमचे सगळे प्रश्न संपून जातात.त्या गाढ निद्रेमध्येंच तुमच्या प्रश्नांची उत्तरं तुम्हाला मिळतात.पुष्कळजण मला सांगतात " माताजी , तुम्ही माझ्या स्वप्नांत आलात आणि कुठलं औषध घ्यायचं ते मला सांगितलत - तुम्ही माझ्या स्वप्नांत आलात आणि या - या प्रकारच्या जीवनामध्येंच माझं कल्याण आहे असं म्हणलात." हे लोक मला येतांना बघतातही , पण त्यावेळी मी माझ्या पूर्ण रुपात नसते - ही महाकाली शक्तीच तुम्ही गाढ निद्रेमध्यें असताना तुमच्यावर काम करते , ती तुमच्या स्वप्नांमधें येते , तुम्हाला सांगते आणि समजावते.

पण या देवीची सगळ्यात मोठी कृपा म्हणजे ती तुम्हाला पावित्र्य व अभय देते.लहान मुलांना जन्मतःच पावित्र्य , लाज , चांगुलपणा , नीतिमान वागणुक इ. गुण मिळालेले असतात.पण नंतर हळूहळू आजूबाजूच्या लोकांची वाईट वागणूक बघून ती पण तसच वागू लागतात.नीतिमत्ता हे त्यांना बंधन वाटू लागत.अर्थात ती (देवी) त्यांना उपदेश करायला - हे योग्य नाहीं , असं करु नये , हे चूक आहे व असतेच.पण जसजसं वय वाढून तुम्ही प्रगल्भ होत जाता तसं तुम्ही या गुणांचा आदर करेनासे होता आणि त्यामुळे अपरिपक्व व मूर्ख बनता.हे सर्व ध्यानांत बसून समजून घेतलंत तर ही महाकाली तुम्हाला खूप मदत करते कारण तिच्याचमुळे कुंडलिनीचा वर येण्याचा मार्ग खुला होतो.महाकाली आणि कुंडलिनी एकच आहेत कारण कुंडलिनी ही महाशक्तीचीच शेष शक्ति आहे.पूर्ण विद्याच.फक्त तिचं कार्य वेगळं आहे.महाकाली तुमचं सरंक्षण करते , तुम्हाला उपदेश करते आणि ज्ञान देते , तर कुंडलिनी तुम्हाला स्वच्छ करते.बाधा दूर करते , तुम्हांला गोंधळात न टाकतां उलट तुम्हाला क्षमा करुन तुमची उन्नति होईल ही काळजी घेते.

आता सहजयोगी झाला आहांत तर तुमच्या जीवनांत ही महाकाली पदोपदी मदत करते हे तुम्हालाच स्पष्ट होईल व कळेल.तिचं काम कसं चालतं हे बघणं फार आल्हाददायक असतं - सर्व प्रकारचं समाधान तिच्याकडून तुम्हाला मिळतं. हांव , लोभ , राग सर्व मावळतात. सगळ्यांत चांगलं म्हणजे तुमच्या सर्व वाईट संवयी ती काढून टाकते - अगदीं मुळापासून.या शक्तीच्या प्रभावामुळें अपायकारक अशा सर्व सवयी आपोआप सुटतात.तुम्हाला अशी कांही वाईट सवय असेल तर ती टाकण्याचा प्रयत्न करा - तुमच्यातील महाकाली शक्तिच जागृत झाल्यावर हे सर्व सहजच होणार आहे.तिच्या कृपेमुळेंच तुम्ही आतां सुंदर , गंधर्वांसारखे झाला आहात.तिच्या कौशल्यामुळेंच तुम्ही इतके सुधारलात.आतां पैसा , मोह , लोभ यांच्यापासून दूर रहा.त्याचीच देवाणघेवाण करा.सगळं कांही एकमेकांत वाटून घ्या आणि ही इच्छा ही सामुहिकता आणि त्यातून मिळणारा आनंद ही महाकालीचीच कृपा झाल्यावर मिळतो.म्हणून आपण आज महाकालीची पूजा करणार आहोत.

परमेश्वरांचे तुम्हांला अनंत आर्शिवाद.

# ऋतंभरा प्रज्ञा

लॉजहिल सेमिनार, २३ जुले १९८३

जगाच्या निरनिराळ्या भागातून तुम्ही सर्वजण ह्या ठिकाणी आलेले बघून मला अतिशय आनंद होत आहे.तेव्हा प्रेमाने ह्दय इतके भरुन येते की , शब्द त्याची तीव्रता व्यक्त करण्यास अपुरे पडतात.तुमच्या ह्दयात याची तीव्रता समजावयास पाहिजे.ह्या अशा सुंदर नैसर्गिक वातावरणांत आपण एकत्र भेटलो आहोत , यात मला वाटतं अशी परमेश्वराची व्यवस्था आहे की यावेळी काही तरी वेगळं मोठं घडावयाचं आहे.ह्या वेळी आपण कांहीतरी फार मोठं मिळवलं पाहिजे , आता वेळ थोडा आहे.तेव्हा मी तुम्हाला ध्याना बद्दल काही गोष्टी सांगते व त्यानंतर मला वाटतं आणखी दोन भाषणे होतील.

"मेडिटेशन" हा एक सर्वसाधारण शब्द आहे.ध्यानामध्ये ज्या तीन पायऱ्या आहेत त्या शब्दातून स्पष्ट होत नाहीत.परंतु संस्कृत भाषेत तुम्ही ध्यानात कसे जायचे ह्या संबंधी स्पष्टपणे सांगितले आहे.

**प्रथम ध्यान म्हटलं आहे, दुसरी धारणा सांगितली आहे व तिसरी समाधी.सुदैवाने सहजयोग असा आहे की तुम्हाला या सर्व गोष्टी एकत्र एका बंडल मध्ये मिळतात.तुम्ही बाकी सर्व वगळून समाधीत जाता आणि हेच त्यातील सौंदर्य आहे.प्रथम ध्यान घ्या.प्रथमतः तुम्ही जेव्हा साधक असता तेव्हा तुम्ही ज्याची पूजा करता त्यावर तुमचं चित्त ठेवता.त्याला ध्यान म्हणतात.आणि धारणा म्हणजे तुम्ही केलेले सतत प्रयत्न.तुमचे सर्व प्रथम चित्त त्यावरच केंद्रित करणे.परंतु जे लोक जागृत नाहीत त्यांच्या करिता हे केवळ नाटक ठरतं.ते केवळ फक्त अभिनय करत असतात.परंतु जागृत व्यक्तीसाठी ते सत्य आहे.**

तेव्हा प्रथम तुम्हांला ध्यान केलं पाहिजे.कुणी मूर्तिचे ध्यान करतात तर कुणी अमूर्तीचे करतात.परंतु तुम्ही इतके नशिबवान आहात की अमूर्त सुद्धा तुमच्या समोर प्रत्यक्षात मूर्त स्वरुपात आले आहे.तुम्ही मूर्ताकडून अमूर्ताकडे किंवा अमूर्ताकडून मूर्तता हे सर्वच येथे आहे.एका बंडल मध्ये ,तेव्हा तुम्ही कांही देवतेवर एकाग्रता करता किंवा त्या संबंधी विचार करता किंवा काही ठिकाणी निराकार की जो अमूर्त स्वरुपात करतात किंवा सर्वस्वी निराकारावर चित्त एकाग्र करतात.जो पर्यंत तुम्ही जागृत नाहीत तो पर्यंत सर्व बुद्धिचा खेळ आहे.परंतु एकदा का तुम्ही जागृत झालात की तुम्ही ज्याचे ध्यान करणार आहात त्याचा फक्त विचार करता.

पण जेव्हा तुम्ही एखाद्या व्यक्तीवर ध्यान करता तेव्हा तुमचं चित्त विचलीत होत असतं.ते जागृती नंतर ही शक्य आहे.ते एका बंडल मध्ये आहे.तरी सुद्धा काही लोक ते काही थोडे थोडे करीत घेतात , तेव्हा जरी तुम्ही ध्यान करता तरी तुमचे चित्त घटके घटकेला विचलीत होत असतं. तुम्ही किती एकाग्रचित्त होऊ शकता त्याच्यावर ते अवलंबून असतं.तेव्हा मी काही असे सहजयोगी पाहिलेत की कांही स्वयंपाक करतात तर काही ध्यान करतात तेव्हा ध्यान करणारा म्हणतो की काहीतरी जळण्याचा मला वास येतो आहे.

तेव्हा अशा ठिकाणी धारणा नसते.धार याचा अर्थ प्रवाह.प्रवाह थांबल्यास त्या ठिकाणी धारणा नाही , .ध्यान आहे पण धारणा नाही , ह्यातील दुसरा भाग फार महत्वाचा आहे.तुम्हाला तुमचं चित्त सतत तुमच्या देवतेवर ठेवावयास पाहिजे.तेव्हा तुम्ही एक स्थिती मिळविता कि ज्याला धारणा



पुढील मजकूर मागील कव्हर पानावर -

मागिल कव्हर पानावरून पुढे -

म्हणतात की ज्यात तुमचं चित्त त्या देवतेशी एक होतं आणि जेव्हा हे परिपक्व होतं तेव्हा तुम्हांला समाधी अवस्था प्राप्त होते.

आत ज्या लोकांना असं वाटतं की जागृती शिवाय ते हे कसं करु शकतात तर ते पूर्णतया चूक आहे.परंतु जागृति नंतर जेव्हा तुमची धारणा प्रस्थापित होते तेव्हा तुम्हांला अशा अवस्थेत जावे लागते की ज्यामध्ये तुमची समाधी लागेल.आता ही अवस्था काय आहे ? जेव्हा तुम्ही या अवस्थेत असता तेव्हा तुम्ही जे काही करता , तुम्ही ज्या देवतेला पूजता ते दैवत तुम्ही तुमच्या कामांत बघता तुम्ही असं म्हणू शकता की जे काही तुम्ही बघता तुम्हाला तुमचे दैवतच ते करत आहे असं दिसतं , तुम्ही जे काही ऐकता , तुम्हाल तुमचे दैवतच ते सत्य सांगत आहे असं वाटतं.जे काही तुम्ही वाचतां त्यात तुम्हांला दिसेल कि तुमच्या दैवतेनेच तुम्हाला सांगितलं.तेव्हा तुम्ही तुमच्या डोळ्यांनी , नाकांनी आणि इतर सर्व अवयवांनी जे काही कराल ते सर्व काही तुम्ही ज्या दैवताची पुजा करता त्याच दैवताचं दर्शन तुम्हाला आपोआप घडत , तुम्हाला आता , मला एकाग्रता करावयाची आहे असा विचार करावयास नको , आता मला हा विचार नको ,मला आता हा विचार करायला पाहिजे , हे सर्व काही आपोआप घडतं , तुम्ही एखादं पुस्तक वाचाल आणि तुम्हाला त्यात सहजयोगासाठी काय चांगलं ते सापडलं आहे.जर परमेश्वरा विरुध्द लिखाण केलेलं पुस्तक असेल तर ते तुम्ही टाकून द्याल ,जर तुम्हांला काही अडचणी आल्या असतील ते असं समजा की त्या तुम्हाला काही धडा शिकविण्याकरिता घडलेल्या आहेत. "मला काही अनुभव शिकविण्या करीता " हा सर्व त्या देवताच्या अनुभूतीची प्रचिती आहे.आता उदाहरणार्थ एखाद्या स्त्रीला गर्भपातना होत आहे असे वाटते.तेव्हा एक व्यक्ति की जी समाधी अवस्थेला गेलेली नाही , किंवा सवयींचा गुलाम आहे.तो म्हणेल "मी माताजी साठी एवढं केलं मी इतक्या लांब गेलो.आणि असं असून सुद्धा ही अडचण मला आली." पण दुसरा म्हणेल की , "ठीक आहे मला प्रयत्न करुन बघू दे , मी जाऊन माताजींच्या फोटो समोर सांगेन किंवा टेलिफोन करेन." आणि त्याला असे आश्चर्य दिसेल की ते सर्व कांही झालेले आहे आणि एकदम योग्य असंच.

तुम्ही जर जागृत असलात तरच ह्या गोष्टी शक्य आहेत.अन्यथा नाही.तेव्हा ही जी अवस्था तुमच्यात जागृत झाली आहे.ही एक नवीन स्थिती आहे.संस्कृतमध्ये तिला सुंदर नांव आहे.फार कठिण नांव आहे. "**ऋतंभरा प्रज्ञा**".ऋतंभरा हे निसर्गाचं नांव आहे , आणि एखाद्याला तो निसर्ग प्रकाशित झालेला जाणवतो.मी तुम्हांला एक उदाहरण देते , ज्यावेळी मुल जन्माला येत असतं.त्यावेळी त्याच्या आईला आपोआप दूध येते.निसर्ग मुलांच्या जन्माकरिता आपोआप कार्यान्वित होत असतो.

त्याचप्रमाणे फक्त सहज योग्याच्या ठिकाणी ही ऋतंभरा प्रज्ञा जेव्हा कार्यरत होते तेव्हा काम कसे चटकन घडतं हे बघितलं तर तुम्हांला आश्चर्य वाटेल.आता वेळ थोडा आहे.पण मी तुम्हाला एक उदाहरण देते , मी ब्रायटनला आले आणि जॉन्सन म्हणाला "माताजी ब्रायटन मध्ये गुरुपूजा करु या." मी म्हटलं "ठिक आहे करा.परंतू जागा शोधून काढा." तेव्हा तो युनिव्हर्सिटीत गेला , म्हणाला , की युनिव्हर्सिटीचे लोक मदत करतील परंतु जागा लहान आहे आणि मी म्हणाले "परंतु त्यांना विचारुन तर बघा.मग तो म्हणाला "नाही ती जागा गुरुपूजेच्या दिवशी रिकामी नाही." मग मी म्हणाले की तुम्ही काय करु शकता ? तो म्हणाला की "माताजी काय करायचं ?" मी म्हणाले "दुसरे कुठे तरी आत्ताच्या आत्ता प्रयत्न करा." फोनवर कुणाला तरी विचारा." नंतर त्यांनी जाऊन त्यांना फोन केला , आणि त्यांनी सांगितलं की आमच्याकडे जागा आहे , फारच चांगली जागा आहे , आणि तुम्ही तावडतोब या , जेवायलाच या , तो लगेच तेथे गेला.त्याने तेथे उत्कृष्ट जेवण केलं , ते सर्वजण खूप खूप होते.ते सर्वांनाच जागा देणार होते.ते फारच चांगले लोक होते.आणि ह्या सर्व गोष्टी इतक्या चांगल्या रितीने कशा घडल्या याचे त्याला आश्चर्य वाटले.

तेव्हा ऋतंभरा प्रज्ञा ही तुमच्या मदतीसाठी कार्यान्वित होत असते.तुम्ही सर्व मला सांगता की माताजी हे आश्चर्य घडले ते घडलं आणि आम्हांला समजलं नाही की ते कसं घडलं.मी एक तुम्हाला उदाहरण देते.काल आम्ही काही तरी सिमेंटचे काम करीत होतो.तेव्हा इटालियन मुलगा म्हणाला की आपल्याला दोन पिशव्या सिमेंट लागेल.मी म्हणाले , "तू काम चालू ठेव ते संपणार नाही." मी जाण्याच्या आगोदर सुद्धा ते काम चालू होतं आणि सिमेंट संपलं नव्हतं.आता बघा एवढी सिमेंट सारखी गोष्ट.

तेव्हा ही एक विशेष गोष्ट आहे की निसर्ग तुमच्याशी एकरुप झाला व तुम्ही निसर्गाशी एकरुप झालांत तेव्हा या दैवी शक्तिचे प्रेम , संरक्षण आणि तुमच्या प्रति चित्त ह्या काही घटना घडतात.जी काही परिस्थिती निर्माण होते त्यांतून प्रदर्शित होतं , आणि ह्याला अंत नाही , जे फक्त घडत असतं.पण लोकांना ते कसं घडतं ते समजत नाही.पण तीच समाधीची स्थिती आहे.परंतु असे काही लोक असतील की "मी जर त्यांना विचारलं की तुम्ही हे कराल का ?" ते म्हणतील "माताजी आता दुकानं बंद झाली असतील , ते काही बरोबर नाही , ते करणार नाही अशा तऱ्हेने ते सांगत

राहतील आणि काही असेही लोक आहेत की ते म्हणतील "नाही मला बघू द्या , जर माताजी म्हणत आहेत तर ते होईलच."

मी आता अगदी साधे उदाहरण देते , फारच बाह्यातले आहे.पण ते सत्य आहे.**श्री श्रीवास्तव हे काही विशिष्ट प्रकारे चहा घेतात.फारच इंग्लिश आणि त्यांना दुसरा चहा आवडत नाही.तेव्हा ते मला म्हणाले, "अरे बापरे आपला चहा संपला आणि उद्या सकाळी काय करायचे?" तेव्हा म्हणाले, "ठीक आहे.चला आपण चहाच्या दुकानात जाऊ."तेव्हा ते म्हणाले, "आता रात्रीचे आठ वाजले आहेत.ते सर्व आपल्याला हसतील व आता रात्री आठ वाजता कुठलेही टी सेंटरचे दुकान उघडे नसेल." मी म्हणाले, "बघू तर जाऊन त्यात अडचण काय आहे? मी म्हणते चला जाऊ या." परंतु ते म्हणाले, "काय विचित्र गोष्ट तुम्ही सांगत आहात." मी म्हणाले, "ठीक आहे.विचित्र किंवा काहीही असो, चला तर खरे." परंतु ते ऐकेनात तेव्हा मी ड्रायव्हरला सांगितले.चला आपण तिकडे गाडीने जाऊ या.आम्ही तेथे गेलो.आणि सर्व दिवे लागलेले होते.आम्ही म्हणालो हे सर्व दिवे कसे लागलेले आहेत? तेव्हा आम्ही आंत गेलो फारच ओशाळलेले ते सर्वजण तेथे उभे होते."आम्ही सर्वजण आपल्यासाठी केव्हाची वाट पहात आहोत आणि तुम्ही सर्वात शेवटी आलात." पहा कल्पना करा.तेव्हा मी माझ्या पतिला विचारले, ते म्हणाले, " मी विसरलो आपल्याला आज येथे स्वागत समारंभ होता, आणि ते म्हणाले, "तुम्ही सर्वात शेवटी आलात." आणि म्हणाले, "काही हरकत नाही.तुम्ही तुमचे प्रेझेन्टस् घ्या." तेव्हा त्यांनी प्रत्येकी दोन चहाचे डबे प्रेझेंट दिले.**

माझा म्हणण्याचा अर्थ असा की अशी हजारो उदाहरणे देता येतील आजच कुणीतरी पलंग सरकविण्याचा प्रयत्न करीत होते.तिघेजण प्रयत्न करीत होते.मी म्हणाले "ठीक आहे.मी सरकवते." मी फक्त माझी नाभी तेथे लावली.मी काही ढकलले नाही.ते असंच पुढे सरकलं ते केवळ ऋतंभरा प्रज्ञेमुळे.परंतु ह्या काही चमत्कार नाही.हे ईश्वराचे तुमच्या वरील प्रेम प्रदर्शित करणे , तुम्हांला , तुम्ही कोणी खास निवडलेले आहात , हे दाखविण्यासाठी आहे.परंतु ही परिस्थिती तुम्ही मान्य केली पाहिजे.

पण तुम्ही जर सर्वसाधारण लोकांसारखे वागलात की , "अरे देवा , दुकाने बंद असतील , तो माणूस किती विचित्र आहे , मला वाटत नाही की ते काम होईल." तेव्हा ते कधीच होणार नाही.पण तुम्हाला हे समजलं पाहिजे की निराकार व साकार मी अशा तुम्हाला जन्म दिलेला आहे. तुम्ही निवडलेले साधू संत आहांत तेव्हा ही प्रज्ञा प्रदर्शित होत असते.प्रत्येक क्षणाला प्रदर्शित होत असते.तुम्ही तयारीत रहा , आनंदी रहा आणि तिचं स्वागत करा.आणि विश्वास ठेवा की तुम्ही जिथं आहात त्याची पातळी वेगळी आहे.

आता वेळ झालेली आहे की सहजयोग्याने आपली पातळी बदलली पाहिजे.आपण बदललं पाहिजे.आपण आपली उन्नती केली पाहिजे.पातळी उंचावली पाहिजे.परंतु सहजयोग असं काही मिश्रीत आहे की एकाच प्लेटवर आपल्याकडे अत्यंत खराब अशा भुतापासून अगदी वरच्या दर्जाचे लोक आहेत.आता काही जण गेले आहेत.फार अहंकारी आहेत.ते सारखे गडगडत असतात.आपल्याला समजत नाही की ही प्लेट उंचावयाची कशी? जर तुम्ही ती प्लेट उंचावली तर ते गडगडत खाली येतील.

तेव्हा तुम्ही घाबरलेले आहांत तुम्हाला त्यांना धरुन ठेवलं पाहिजे.आणि काही असे आहेत की ते चौरस आहेत व दुसऱ्याच्या समस्या भुताप्रमाणे आपल्या डोक्यावर घेतात.जर तुम्ही त्यांची उन्नती करण्याचा प्रयत्न कराल तर ते खाली घसरत येतील किंवा भूते पडतील.परमेश्वराला माहित? पण तिसऱ्या प्रकारचे लोक आहेत की जे लोकच आहेत मनोऱ्यासारखे की जे अगदी चांगल्या रितीने स्थिर झालेले आहेत.तुम्ही ज्या उंचीवर त्यांना न्याल तेथेच ते टिकून राहतील.

तेव्हा जे लोक अजून काठावर आहेत ते मला नक्कीच त्रासदायक आहेत.कारण माझ्या प्रेमामुळे मी त्यांना बाहेर फेकू शकत नाही.आणि आपल्याला त्यांना मदत करावयास पाहिजे.त्यांना उन्नती करावयास पाहिजे.खरे पहातां त्यांना त्यातून बाहेर यावयास पाहिजे , आपण त्यांच्यासाठी किती वाट पहायची प्रत्येकांनी बघितलं पाहिजे की जे काठावर आहेत.त्यांना नीटपणे आत आणलं पाहिजे.म्हणजे ते सहजयोगातून बाहेर जाणार नाहीत.जिव्हाळा ठीक आहे.पण आपली सहजयोगाची पातळी खाली करुन चालणार नाही.कधीच नाही.

**जे लोक सहजयोगात चागले प्रस्थापित झाले आहेत त्यांची पातळी उंचावयास पाहिजे. तेव्हा प्रत्येकाने किमान पातळी पर्यंत येण्याचे व स्थिर करण्याचे प्रयत्न करावे. नाहीतर मला सांगण्यास खेद वाटतो की ते चाळणीतून गळले जातील.**

धन्यवाद.

धन्यवाद माताजी - शिष्य म्हणाले.